एका उपासकाचे हितगूज





एका उपासकाचे हितगूज

लेखक

विजय बाळकृष्ण काणे

एका उपासकाचे हितगुज

प्रकाशक : सौ. स्वाती विजय काणे

महेश निवास, लो. टिळकनगर रो. नं. ३, म. गांधी रोड, गोरेगाव (प), मुबंई- ४०० १०४.

दूरध्वनी : २८७५९१४६

मुद्रक : साई प्रिंटर्स

मुखपृष्ठ : प्रकाश गिरमकर फोन : ९८२०८०० १६७

लेखक : विजय बाळकृष्ण काणे

E-mail Id: kanevijay99@yahoo.com

मूल्य :-रू. १५०/

अर्पण पत्रिका

ज्यांच्या ज्यांच्यापासून मी काहीतरी शिकलो

त्या सर्वांना हे पुस्तक अर्पण

अनुक्रमणिका

प्रस्तावना

शुभाशीर्वाद

श्री. विजय बाळकृष्ण काणे यांनी लिहिलेले "एका साध्या उपासकाचे हितगूज" हे छोटेखानी पुस्तक त्यांनी मला वाचायला आणि अभिप्रायार्थ दिले.

त्याच दिवशी मी श्री काणे यांना प्रथम पाहिले आणि हा एक सच्चा माणूस आहे असं जाणवलं. त्यांच्या सोबत श्री टकले सुद्धा होते त्यांनी सुद्धा माझ्या मताला दुजोरा दिला.

अनेक आध्यात्मिक साधकांची चरित्रे आणि रचना मी आता पावेतो वाचल्यात. काही अतर्क्य तर काही अविश्वसनीय वाटाव्या अशा. काही तर्क व शुद्ध विवेकाच्या कसोटीला उतरणाऱ्या तर काही आपल्या आध्यात्मिक अनुभवांच्या कसोटीवर खऱ्या ठरणाऱ्या. काही अचंब्यांत टाकणाऱ्या तर काही डोळे दिपवून टाकणाऱ्या अनुभवांचे भांडार असलेल्या.

आज तर प्रत्येक क्षेत्रामध्ये झगमगाट आणि डोळे दिपवणाऱ्या अनुभवांचे पीकच आल्यासारखे दिसते. प्रत्येकामध्ये आपला माल जास्तीत जास्त खपवण्याची अहमहमिका लागलेली दिसते.

अशा बाजारू वातावरणांत कोणताही भपका नसलेले, दिखावूपणा नसलेले व अतिरेकीपणाचा अशंही नसलेले साध्या साधकाचे सच्चे लेखन असे श्री. काणे यांच्या ह्या अनुभवांबद्दल म्हणता येईल.

श्री. काणे हे एक साधक आहेत. आणि त्यांचे फार मोठे वैशिष्टय म्हणजे ते साधे सरळ नियम करणारे पण एकदा केलेला नियम अत्यंत कसोशीने पाळणारे साधक आहे. आणि खर तर ह्यातच श्री. काणे ह्यांचे मोठेपण लपले आहे.

व्रत किंवा नियम साधा असल्यामुळे त्याचा बडेजाव नाही किंवा डांगोरा नाही पण त्याबद्दलची निष्ठा चोवीस कॅरट इतकी खरी आहे हे पुस्तक वाचून कळते.

खरा प्रताप निष्ठेमध्येच आहे आणि साधनेचे किंवा नियमांचे सातत्य राखण्यात आहे हेच खरे मर्म आहे. थोडंच करा पण एकदा नियम केला की तो पाळलाच पाहिजे अशा निष्ठेने करा हे साधनेचे खरे मर्म श्री काणे यांना पूर्णपणे उमगल्याचे ह्या पुस्तकावरुन दिसते.

जशी निष्ठा तसे फळ हा साधकांचा अनुभव असतो. श्री. काणे ह्यांना त्यांच्या निष्ठेच्या परिणाम स्वरुप अनेक दिव्य अनुभव आले आहेत.

एकंदरीत श्री काणे ह्यांचे हे पुस्तक म्हणजे एका साधकाचे प्रांजळ आत्मनिवेदन आहे. त्यांत तथाकथित भव्यता नसेल पण सच्चेपणा, प्रांजळपणा आणि अनुभव समृध्दी पानोपानी पहायला मिळते. त्यांची भाषा सरळ व ओघवती आहे.

एकंदरीत हे पुस्तक वाचकांना प्रेरणा देणारे ठरेल व साधनेला प्रवृत्त करणारे ठरेल ह्यांत शंका नाही.

धनंजय देशपांडे

माजी न्यायमूर्ती

मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

मोबाईल : ९८६९४०४५८७२

४/०८/२०१५.

मनोगत

आठवणींना शब्द रुप देऊन तर झाले. उर्वरित आयुष्य ध्यान धारणेत जमेल तसे जनसेवेत ज्योतिषीय सल्ला देऊन व्यतीत करावयाचे हेही ठरले. आता या आठवणी पुस्तक रुपाने प्रसिद्ध कराव्यात असे वाटले. चार /पाच हितचिंतकांशी चर्चा केल्यावर अनुकूल प्रतिसाद मिळाला तेव्हा मुखपृष्ठ कसे असावे हा प्रश्न पुढे आला. २६-५-२०१५ रोजी सकाळी ध्यानाला बसलो असता असे सूचिवण्यात आले (अज्ञात शक्तीकडून) की मुखपृष्ठाकरिता जन्माच्या वेळी जो प्रसंग घडला त्याचेच चित्रण मुखपृष्ठावर का करत नाहीस? वास्तविक या पूर्वी दोन दिवस मी श्री टकले सरांशी या विषयावर चर्चा करत होतो. परंतु आम्हाला निर्णयाप्रत येता आले नाही. परंतु आज ध्यानातील विचाराने तो निर्णय पक्का झाला. आता हे काम कोण करणार यासाठी टकले सरांचे पूर्वपरिचित स्वामिभक्त श्री प्रकाश गिरमकर यांच्याशी दूरभाषद्वारे संपर्क साधला असता त्यांनी त्वरित येऊन आमच्या कल्पनेला रेखाचित्राद्वारे मूर्त रुप दिले व तसेच मुखपृष्ठ निश्चित झाले व मीही निश्चिंत झालो.

१. माझ्या जन्माची गोष्ट

पहिल्या अमेरिकन स्त्री वार्ताहराचे आत्मचरित्र वाचावयास घेतले असता, पहिलीच ओळ अशी आली, की, I was born when I was wanted, दोन दिवस मी यावर विचार करत होतो व ही गोष्ट माझ्या आईखेरीज कोणी सांगू शकणार नाही. त्यामुळे एक दिवस घरी आई व मी असतांना आईला हा प्रश्न विचारला की मी तुम्हाला हवा असतांना झालो का? क्षणभर आई स्तिमित झाली व तिने सांगितले की तुझ्या या प्रश्नामुळे मला तुझ्यात व तुझ्या इतर भावंडातील फरक समजला. दुसरे म्हणजे मला मुलगाच होणार व त्याला मी अमुक नावानेच हाक मारणार हे मी दुसऱ्याच महिन्यात ठरविले होते. तुझ्या जन्माच्या दोन दिवस अगोदर दुपारी एक संन्यासी आला त्याचा वेश रामदासी सारखा होता. (शुभ्र वस्त्र मानेवर गाठ मारलेले) त्याने भिक्षा मागितली. बारानंतर भिक्षा द्यावयाची का नाही हा माझ्यापुढे प्रश्न होता. त्यात मी अशा अवस्थेत परंतु त्याने सागितले काळजी करु नका मला भिक्षा वाढा. भिक्षा दिल्यानंतर त्याने एक नाणे व लाखेचा मारुती मला दिला. मी विचारले की काही बर वाईट झाले तर! तो म्हणाला काही काळजी करु नका तुम्हाला मुलगा होईल.

आणि त्याप्रमाणे सोमवारी पहाटे माझा जन्म झाला. त्यानंतर मी आईला विचारले की आता त्या वस्तु कोठे आहेत? तर तिने तिच्या ट्रंकेतल्या एका कोपऱ्यात त्या जपून ठेवल्या होत्या. त्यात लाखेचा मारुती नव्हता पण नाणे मात्र होते. ही गोष्ट आईने कोणासही सांगितली नव्हती. फक्त माझी मोठी बहीण व आत्या यांनाच माहीत होती. नाणे पाहिल्यावर त्याच्या एका बाजूस रामपंचायतन व दुसऱ्या बाजूस शिवपार्वती होती. लाखेचा मारुती मला कसा मिळाला ते पुढे सांगेनच. त्या दिवसापासून ते नाणे पूजेत ठेवून त्याचीही पूजा दररोज केली जाते. जन्माच्या वेळेसच असे घडल्यामुळे स्वाभाविकच माझ्यामध्ये आध्यात्मिक प्रवृत्तीची ओढ होती. मागे माझ्या जन्माच्या वेळी जो मारुती मला मिळाला नळता तो कसा मिळाला त्याची कथा.

आज माझ्या ऑफीसमध्ये दोन सरदारजी आले. मी ओळखले हे त्याच्या नानक जयंती निमित्त वर्गणी घेण्यास आले आहेत. मी त्यांना पैसे दिले तेव्हा त्याने फोटो दिला व बोलू लागला की ‘‘भगवानका लाईट जानते हो वो आपको अभी मिलना शुरु हुआ है|’’ मग त्याने एक तारीख दिली व म्हणाला या तारखेपासून तुमचे भाग्य उजळेल. मग माझ्या लग्नाची तारीख व सौ. चे नाव त्याच्या कागदावर बरोबर लिहून दाखविले. मग दोन अंक निवडायला सांगितले व मी निवडलेले अंक त्याने ज्या कागदावर लिहून ठेवले होते ते दाखवले. सकाळी लवकर उठून एकांतात बसा जिथे कोणताच आवाज येणार नाही. आता लवकरच तुम्हाला परमेश्वराचे दर्शन होणार आहे असे सांगितले. त्यानंतर त्याने एक लाखेचा मारुती व रुद्राक्ष दिला. अशा तऱ्हेने माझ्याकडे नसलेला मारुती मला प्राप्त झाला.



नाण्यावरील रामपंचायतन



नाण्यावरील शिवपार्वती



लाखेचा मारूती

२. बुद्धीची देणगी व नियमीतपणा

मी सातवीत असतांना जिन्यामध्ये अभ्यास करत बसत असे. त्यावेळी आमच्या इमारतीच्या मालकाकडे एक साधू आला होता व त्याची सोय पाचव्या मजल्यावर केली होती. साहजिकच तो वर जाताना मला पहात असे. एक दिवस त्याने थांबून सांगितले की उद्या तू अंघोळ करुन सकाळी माझ्याकडे ये. दुसऱ्या दिवशी त्याच्याकडे गेल्यावर त्याने मला बसावयास सांगून एका कागदावर लाल शाईने खालील श्लोक लिहिला.

नमस्ते शारदे देवि काश्मीरपुरवासिनि।

त्वामहं प्रार्थये नित्यं विद्यादानं च देहि मे ।।

हा श्लोक मला दररोज म्हणावयास सांगितला. तेव्हापासून आजपर्यंत दररोज स्नानानंतर मी हा श्लोक म्हणतो. माझी तथाकथित बुद्धी कदाचित् त्यामुळेच असावी. माझ्यामध्ये नियमितपणा आणण्याचे श्रेय पुण्याचे संघचालक माननीय श्री. बाबाराव भिडे यांजकडे जाते. त्यांनी सांगितले की प्रातःस्मरणाचा एक श्लोक दररोज लिहावयाचा. माझ्या आगाऊ वृत्तीमुळे सर्व श्लोक मी ठराविक वेळीच लिहावयाचे असेही ठरविले. त्याप्रमाणे प्रथम ३१ श्लोकानतर खंड पडला तेव्हा परत पहिल्या श्लोकापासून सुरवात केली त्यावेळी ४२व्या श्लोकानंतर खंड पडला. त्यानंतर परत प्रथम श्लोकापासून सुरवात केली. यावेळी मात्र खंड न पडता प्रात:स्मरण लिहून पूर्ण केले. तसेच स्वयंसेवकाला भगवद् गीता यावयास पाहिजे हे त्यांनी सांगितल्यामुळे दररोज गीता वाचावयास सुरुवात केली व प्रयत्नाने दीड तासात संपूर्ण गीता वाचू लागलो.

३. रामकृष्ण मिशन व पांडुरंगशास्त्री आठवले

कॉलेजच्या पहिल्या वर्षीच खारच्या रामकृष्ण मिशनच्या आश्रमात माझे मित्र श्री सुबह्मण्यम् (एम.एस.सी. गोल्ड मेडलिस्ट) हे मला बरेचदा घेऊन गेले. त्यामुळे रामकृष्ण मिशनतर्फे प्रकाशित झालेले त्यावेळचे बहुतेक वाङ्मय मी वाचले. तसेच ब्रिटीश कौन्सील लायब्ररीतून मी रवींद्रनाथ टागोर यांचे संत साहित्य वाचले. त्याचा उपयोग मला स्टाफ सिलेक्शनच्या इंटरव्ह्यूमध्ये झाला. तसेच माझे मित्र श्री. बार्शीकर यांचेमुळे पांडुरंगशास्त्री आठवले यांच्य माधवबागेतील प्रवचनासही बरेचदा हजर राहिलो. तसेच त्यांच्या ठाणे येथील तत्वज्ञान विद्यापीठामध्ये तीन दिवसांचे जे ग्रॅज्युएट शिबिर झाले त्यालाही हजेर लावली. आज खार येथील रामकृष्ण मठामध्ये श्री कालिपथ महाराजांनी मंत्रदीक्षेकरता अर्ज भरुन घेतला व १३-११-११ रोजी सकाळी ७ वाजता श्री स्मरणानंद महाराज यांचेकडून मंत्र दीक्षेकरता येण्यास सांगितले. त्यानुसार त्या दिवशी तेथे गेलो असता तेथे श्री बोस यांनी धोतर नेसवले व नंतर स्मरणानंद स्वामींनी मंत्र दीक्षा दिली.

४. आचार्य रजनीश

१९७० च्या दरम्यान आचार्य रजनीश यांच्या प्रवचनाला मी आवर्जून हजर राहत असे व त्यावेळी त्यांचे प्रकाशित झालेले मुख्यत: महावीर वाणी, कृष्ण मेरे दृष्टि में, लाओत्से - यांच्यावरील पुस्तके वाचली. त्यांच्या कोरेगांव येथील आश्रमाच्या उद्घाटनालाही मी तीन दिवस हजर होतो. मे १९७२ मध्ये मरीनलाइन्स येथील सुंदराबाई हॉल येथे घडलेली घटना नमूद करण्याजोगी आहे.

मी प्रवचनाला जाऊन बसलो असता (प्रवचन सुरु होण्यापूर्वी) त्यांचे दोन साधक माझ्याजवळ आले व मला म्हणाले की आज तुम्हाला स्टेजवर बसावयाचे आहे. मी होय म्हटले उठलो व बाहेर सटकलो व पाच मिनिटानंतर येऊन दुसऱ्याच जागेवर बसलो. परत दोन साधक आले व मला म्हणाले तुम्हाला स्टेजवर बसायचे आहे. मी परत होय म्हणून बाहेर सटकलो व पाच मिनिटांनी येऊन तिसऱ्याच जागेवर बसलो. आश्चर्य म्हणजे परत दुसरेच दोन साधक आले व त्यांनी मला तुम्हाला स्टेजवर बसायचे आहे असे सांगितले. आता मात्र माझा नाइलाज झाला. मी स्टेजवर गेलो व त्या दिवसाचे संपूर्ण प्रवचन रजनीश यांच्या बाजूला बसून ऐकले.


त्याच वेळेचा दुसरा अनुभव म्हणजे ते म्हणाले की मी शक्तिपात दीक्षा देणार आहे तरी ज्या साधकास यायची इच्छा असेल त्याने अनवाणी हातात गुलाबाचे फूल घेऊन चौपाटी येथील बिर्ला क्रीडा केंद्रामध्ये यावे. पुढे ते असेही म्हणाले की एखाद् वेळेस या शक्तिपातामुळे तुम्ही वेडेही होऊ शकता. हे लक्षात घेऊन ज्यांना यायचे त्यांनी यावे. असे म्हटल्यामुळे जाण्याबद्दल घालमेल सुरु होती. पण विचार केला की जो जाणतो की हा कशामुळे वेडा झाला आहे तो शहाणाही करु शकतो.

या विश्वासाने मी त्या कार्यक्रमाला गेलो आश्चर्य म्हणजे प्रवचनाला हजारो लोक असतांना तिथे फक्त २१ जणच होते. त्यानंतर आणखीही दोन शक्तिपात दीक्षांच्या कार्यक्रमांना मी गेलो होतो. त्यामुळे माझा काय फायदा झाला हे मला ठाऊक नाही. परंतु ज्या ज्या वेळी मी पुण्यासही प्रवचनाला जायचो त्यावेळी ते माझ्याकडे पाहून स्मितहास्य करीत. तसेच परदेशातून प्रथम दिल्लीला आले त्याही वेळी ते मलाच स्वप्नात दिसले. याची खातरजमा मी माझ्या धाकटया भावाकडून करुन घेतली ज्याने त्यांच्याकडून दीक्षा घेतली आहे. आचार्य रजनीशांच्या प्रवचनास जात असता व त्यांचे प्रकाशित वाङमय वाचन करीत असतांना एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे ते म्हणायचे की जर प्रश्न तुम्हाला पडला असेल तर उत्तरही तुम्हीच शोधा. उसन्या उत्तरावर समाधान मानू नका. हे तत्त्व अमलात आणल्यानंतर अनावश्यक चौकशीही थांबली. तसेच प्रश्न पडला असेल तर त्याचे उत्तर मिळेपर्यंत वाट पाहण्याची सबुरी निर्माण झाली.


तसेच मी पहाटे स.का.पाटील उद्यानाच्या बाजूला फिरत जात असतांना लागणाऱ्या प्रत्येक वृक्षाला नमस्कार करीत असे व परतीच्या वाटेवर समोरच्या बाजूकडील वृक्षांना नमस्कार करीत असे. त्यामुळे या रस्त्यावर मला कधीही भीती वाटली नाही. कारण ते वृक्ष माझे संरक्षक आहेत असे वाटे.

नम्रपणा येण्याकरिता अंघोळीपूर्वी मी बाथरुम स्वच्छ घासत असे. तिथे डोके ठेवून नमस्कार करायचो व नंतर स्नान करीत असे. तसेच त्या काळात मी आणखी एक प्रयोग केला की पानात पहिल्यांदा जे व जेवढे पडेल, तेवढेच खाऊन उठायचे अधिक मागायचे वा घ्यायचेही नाही. तसेच दोन वर्षेपर्यंत मी भात पूर्ण सोडला होता.

आश्रमातील ओळखपत्र



प्राचार्य रजनीश यांची स्वाक्षरी



ओळखपत्राची मागील बाजू

५. साईचरित्राचा अनुभव व शिर्डी

एकदा कोणी म्हणाले की साईचरित्राचे पारायण केल्यावर ते स्वत: येऊन दक्षिणा घेऊन जातात. याची शहानिशा करण्यासाठी मी साई चरित्राचे पारायण केले व मुद्दाम दक्षिणा फळीवरच्या बॅगेत ठेवली व आईलाही बजावले की कोणी मागावयास आल्यास त्याला तू दक्षिणा देऊ नको.

दुसऱ्या दिवशी सकाळी ६.४५ वाजता अचानक एक साधू आमच्या दरवाज्याजवळ आला (त्यावेळी मी गिरगावात ४थ्या मजल्यावर राहत होतो.) मी साधूला नमस्कार केला त्याबरोबर त्याने सांगितले माझी दक्षिणा दे. आणि मी झपाटल्यासारखा वर चढून बॅगेतील दक्षिणा काढली व त्याला दिली. चहा घेता का? असेही विचारले तो नाही म्हणाला व वळला आणि क्षणार्धात माझ्या डोक्यात प्रकाश पडला व मी तिरासारखा धावत चार जिने उतरुन खाली आलो पण जिन्यात वा इतरत्र कुठेही तो साधू दिसला नाही.

खूप वर्षापूर्वी म्हणजे आताचे शिर्डी संस्थान नव्हते त्यावेळी मी व माझा मित्र शिर्डीस गेलो. तिथे खोलीचे भाडे भरुन आम्ही खोली घेतली. पहिल्याच दिवशी (कोजागिरी) रात्रीची आरती झाल्यावर दर्शन घेऊन आम्ही प्रसाद घेतला व बाहेर पडलो. बाहेर प्रकाश असल्याने आम्ही लांबवर चालत जाण्याचे ठरवले व तसे चालत होतो. बरेच अंतर गेल्यावर अचानक लक्षात आले की मी एवढे चालत असतांना सातत्याने प्रसाद खात होतो व अचानक लक्षात आले की मी एवढा वेळ खातोय पण प्रसाद संपत कसा नाही आणि ज्या क्षणी हे लक्षात आले त्याच क्षणी प्रसाद संपला. त्यामुळे मी दुसऱ्या दिवशी बाबांना पंचामृती स्नान घातले. आता ती सोय नाही.

तसेच तिसऱ्या दिवशी मी खोली देणाऱ्या कारकुनाकडे सांगितले की तीन दिवसांच्या वर तुम्ही खोली देत नाही हा नियम मला माहीत आहे. परंतु माझे इथून जाण्याचे मन करीत नाही. माझ्याकडे न पाहताच तो कारकून म्हणाला तुम्हाला कुणी जा म्हणून सांगितले? तेव्हा मी म्हणालो हे तीन दिवसांचे पैसे घ्या. तेव्हा तो म्हणाला मी मागितले का? त्यावर मी म्हणालो तीन दिवसानंतर माझ्याजवळ पैसे असतील याचा मला भरवसा नाही, तरी कृपा करुन तुम्ही पैसे घ्या. त्यावर ता म्हणाला राहू द्या हो तीन दिवसानंतर पाहू.

नंतर आमचा एक मित्र आला व तो म्हणाला की उद्या आपण काकड आरतीला जाऊ या. तुम्ही अजून गेला की नाही? मी नाही म्हटले. काकड आरतीसाठी ४ वाजता उठणे आवश्यक होते. दुसऱ्या दिवशी ४ वाजता मला शब्द ऐकू आले उठ तुला जायचे आहे ना? आणि मी उठलो.

तिथल्या सात दिवसांच्या वास्तव्यात आम्ही एकदाही जेवण घेतले नाही. तसेच त्या ठिकाणी तेथील गुरुस्थानाजवळ गेल्यावर हात जोडतांना जो सुगंध जाणवला तो अवर्णनीय आहे. त्या सात दिवसांच्या वास्तव्यात तिथे खाली वर्तमान पत्र आहे हे देखील आमच्या ध्यानात आले नाही. केवळ ते नंतर आलेल्या मित्रामुळे कळले.

२०१३ च्या ऑक्टोबरमध्ये शिर्डीत गेलो होतो. सर्वसाधारणपणे शिर्डीला गेल्यावर साकोरीला उपासनी महाराजांच्या मठात जाण्याचा शिरस्ता आहे. का? कोण जाणे पण आज सकाळपासूनच माझ्या डोक्यात ॐकार मांधाता

हा शब्द घोळत होता. का, कसा, कुठून आला काहीच समजेना. उपासनी महाराजांच्या मठात गेल्यानंतर बऱ्याच वर्षांनी प्रसिद्ध झालेले त्यांचे चरित्र मी खरेदी केले व रात्री गोविंदधाममध्ये आलो व आणलेले चरित्र वाचावयास सुरुवात केली. त्यातील एका पानावर ॐकार मांधाता यांचे संपूर्ण विवरण सापडले व त्यामुळे सकाळपासून पडलेल्या शंकेचे निरसन झाले.

६. गिरनारी बापू

१९८० च्या कालावधीत मी श्री गिरिनारी बापू यांच्या सान्निध्यात आलो. पहिल्या वेळेस गाडीने वेरावळ येथे स्टेशनवर मित्रासमवेत बसलो होतो व त्यांची वाट बघत होतो. अर्धा तास झाला. ते आले नाहीत. तेवढ्यात मला अचानक एक सुगंध जाणवला व मी मित्रास म्हटले की बहुतेक ते येत आहेत. त्याप्रमाणे ते आले व आम्हास घेऊन त्यांच्या आश्रमात गेले.

गाडीतून त्या पूर्ण गिरनारचे दृश्य बघून माझ्या मनात आले की इथे जेवण्याखाण्याची काय सोय होणार? आणि आश्चर्य म्हणजे त्या दिवशी बुंदीचे जेवण मिळाले. कारण तिथे अशी प्रथा होती की नवविवाहित जोडपे तिथे जेवण देत असे. माझा त्यांचा पूर्व परिचय काहीच नव्हता. परंतु ते मला अत्यंत प्रेमाने विजय अशी हाक मारुन माझ्याशी बोलत असत. त्यांनी मला प्रश्न विचारला की तू कुठे झोपणार? तर मी त्यांच्या झोपडीबाहेरील उघड्या जागेकडे निर्देश केला. त्यावर ते म्हणाले की नाही तू आज माझ्या झोपडीतच झोपणार. रात्री स्वप्नात असे दिसले की कोणीतरी माझ्या छातीला बोट लावले आहे व ते मला घेऊन त्यांच्या गुरुकडे गेले. गुरूंनी विचारले हा कोण आहे त्यावेळी त्यांनी काय उत्तर दिले ते मला माहीत नाही.

त्यानंतर माझ्याजवळ उडून एक रेल्वेचे तिकीट आले व मला माझा सर्वात लहान भाऊ दिसला, ज्याचा संदर्भ मला ५/६ महिन्यांनी लागला. ज्यावेळी लहान भावाजवळ तिकीट नसल्याने त्याला पकडले आहे असा त्याचा फोन आला.

दुसऱ्या दिवशी सकाळी ते मला घेऊन बाहेर आले व एका ठिकाणी मला म्हणाले थांब मी पूजा करुन येतो. व बघता बघता माझ्यासमोरच अदृश्य झाले. पाच मिनीटांनी परत आले त्यावेळी त्यांची मुद्रा अत्यंत प्रसन्न होती व त्यांच्या हातात फुले व केशरी चंदन होते. मला त्यांनी तो प्रसाद घेण्यास सांगितले. त्या चंदनाचा वास काही औरच होता. तसेच बरेच दिवसपर्यंत माझ्या छातीवर बोट ठेवलेली खूण होती.

दुसऱ्या वर्षी शिवरात्रीच्या दोन दिवस आधी मित्राचा फोन आला की उद्या आपल्याला विमानाने जावयाचे आहे व तेथून पुढे गाडीने बापूंच्या आश्रमात जायचे आहे. हे मला बापूंनी सांगितले आहे. त्यामुळे मी दुसऱ्या दिवशी विमानाने व नंतर गाडीने तेथे पोहचलो. ते बसले होते त्या ठिकाणी मी गेलो तेवढ्यात एका व्यक्तीने येऊन त्यांना पैसे दिले. ते त्यांनी माझ्याजवळ दिले. आणखीही दोन व्यक्तींनी आणून दिलेले पैसे माझ्याजवळ दिले. दोन मिनीटांनी मला बाहेरुन काही आणावयास सांगितले. मी बाहेर जाऊन आल्यावर त्यांनी पहिला प्रश्न केला अरे विजय पैसे कुठे आहेत? मी म्हटले इथेच आहेत. पण मी पहातो तर मी ठेवल्या ठिकाणी पिशवी नव्हती. ते परत म्हणाले अरे कुठे ठेवलेस, कुणी नेले म्हणजे. मी म्हणालो आपण असतांना मी त्या पैशाच्या पिशवीची चिंता कशाला करु? त्यावर ते हसले व पिशवीकडे बोट दाखवले.

इथे असतांना एक कुटुंब विचारावयास आले की आम्ही जाऊ का? ते म्हणाले ठीक आहे. आश्चर्य म्हणजे दुसऱ्या दिवशी ते कुटुंब सकाळी गिरनारबाहेर जाण्याचा रस्ता न सापडल्याने परत आले. यांनी विचारले काय झाले?

तेव्हा ते म्हणाले की रात्रभर आम्ही गोल गोल फिरत होतो पण आम्हास बाहेर जावयाचा रस्ता सापडला नाही. तेव्हां आता कृपाकरुन आम्हाला जाण्याची परवानगी द्या. त्यावर ते म्हणाले जा.

ती मंडळी गेल्यावर ते मला म्हणाले विजय त्यांना रस्ता कां सापडला नाही माहीत आहे? मी म्हटले नाही. त्यावर ते म्हणाले की त्यांनी खाद्यपदार्थांचे डबे भरुन आणले होते. निदान जातांना तरी तिथल्या माणसांना ते त्यांनी वाटले असते तर काही बिघडले नसते. त्यांच्या लोभाची त्यांना ही शिक्षा झाली. यावरुन मी दोन गोष्टी शिकलो. एकतर आपण जे काही खाद्यपदार्थ नेले असतील तर ते वाटून टाकावेत व दुसरे म्हणजे त्या देवस्थानाच्या देवतेची अथवा ज्या आश्रमात गेलो त्या आश्रम प्रमुखाची परवानगी घेतल्याशिवाय निघू नये.

मला मुंबईला लगेच जायचे होते. त्यामुळे मी तसे बापूंना सांगितले. ते मला म्हणाले काळजी करु नकोस स्टेशनसमोरील डाव्या हाताकडून तिसऱ्या घरात जा तुला तुझे स्लीपरचे तिकीट मिळेल. मी पैसे विचारले असता ते मला म्हणाले की तुला पैसे देण्याची आवश्यकता नाही. त्याप्रमाणे स्टेशनसमोरील त्या घरी गेलो असता त्या गृहस्थाने मला काहीही न विचारता मुंबईचे स्लीपरचे तिकीट दिले व मी सुखरुप घरी आलो. तिथे तिकीट देणारा व घेणारा दोघेही एकमेकांना ओळखत नव्हते.

पुढील वर्षाच्या शिवरात्रीला एक वेगळाच अनुभव आला. ते नवीन कोरे कपडे घालून बसले होते. धोतर झब्बा व त्यावर जाकीट. मी त्यांच्या शेजारी बसलो होतो. त्याच वेळी गोरक्षा समितीचे काही कार्यकर्ते देणगी मागावयास आले. नेहमीप्रमाणे त्यांनी मला विचारले विजय यांना काय देऊ? मी म्हटले मी काय सांगणार! बर म्हणाले आणि त्यांनी जाकीटच्या आतल्या खिशातून ५० च्या नोटांचे कोरे बंडल काढले त्यावर फक्त जय गिरीनारी असे म्हणून ते त्यांना दिले.


त्याच दिवशी ते मला म्हणाले की अरे इथे साधूंचा मोठा मेळा भरतो तू जाऊन बघून ये. मी म्हटले त्यांना पाहून मला काय समजणार. तुम्ही जर कोणाला मला भेटावयास नेले तर बरे. ते म्हणाले ठीक आहे आणि त्यांनी त्या दिवशी रात्री दोन वाजता मला उठवले व म्हणाले चल फक्त माझ्या मागून चल. रात्री अंधार होता दोन वाजले होते. एका ठिकाणी थांबून त्यांनी मला विचारले बोल तुझी काय इच्छा आहे. मी म्हटले एवढ्या रात्री थंडीत मस्तपैकी चहा मिळाला तर बरे होईल. ते म्हणाले ठीक आहे मागे वळून बघ.

मागे पाहिल्यावर एक साधू ओळीत ठेवलेल्या बशांमधे चहा ओतत होता. चहा पिऊन झाल्यावर ते म्हणाले चल. मागील दृश्याचे काय झाले ते मला ठाऊक नाही. त्यानंतर ते मला एका गुहेत घेऊन गेले. त्या ठिकाणी उच्चासनावर एक काळाकभिन्न बलदंड साधू मांडी घालून बसला होता. तरी त्याची उंची माझ्यापेक्षा जास्त होती. त्याने तीर्थ दिले. तेव्हा बापूनी सांगितले की एकच पळी घे. ते शुद्ध भांगेचे तीर्थ आहे. त्यानंतर आणखी एका साधूचे दर्शन घडवले व आम्ही परतलो. ही गोष्ट तिथे असलेल्या इतर कोणासही ठाऊक नाही.

शिवरात्रीच्या रात्री आम्ही उघड्यावर बसलो असतांना एक अग्निशलाका उजवीकडून डावीकडे असलेल्या गिरनार पर्वताकडे जात होती. त्यावेळी बापूंनी वर पाहून हात जोडले व जयजय गिरनारी म्हणाले. गिरनार समोरचा डोंगर

हा ६४ योगिनींचा डोंगर म्हणून म्हटला जातो. बापू म्हणाले की तू जी अग्निशलाका पाहिलीस त्या योगिनी आहेत व शिवरात्रीला त्या गिरनारवर दर्शन घेण्यासाठी जातात. त्यांच्या कृपेमुळेच मला ते दृश्य दिसले.

दुसऱ्या दिवशी सहज बोलतांना मी त्यांना म्हणालो की माणूस पण चामड्याचाच व त्याच्यात त्याने घातलेली पादत्राणे ही पण चामड्याचीच मग चपला बाहेर काढून देवदर्शनास का जायचे. त्यावर ते म्हणाले तू चांगला प्रश्न विचारलास. आपण जाण्यापूर्वीच उच्च कोटीतील साधुपुरुष लवकर देवदर्शन घेऊन जातात. त्यामुळे त्यांची चरण धूळ आपल्याला प्राप्त व्हावी म्हणून चपला काढून जायचे.



गिरनारी बापू

७. शेगाव व गजानन महाराज पोथी

अशीच घटना मी शेगांवला गेलो असता घडली. मी संस्थानच्या हत्तीला चणे व गूळ दिले असता त्याचे खाऊन झाल्यावर त्याने सोंड बाजूला केली. बाजूला हत्तीण होती. मला संकेत समजला व मी उरलेले चणे गूळ त्या हत्तीणीला दिले. तीन दिवसांच्या माझ्या वास्तव्यात मी दररोज हे करीत असे. तिसऱ्या दिवशी गाडीच्या नादात मी परस्पर स्टेशनवर गेलो. तेथे समजले की गाडी ६ तास उशीरा आहे.

तेव्हा प्लॅटफॉर्मवर बसून काय करावयाचे तेव्हा विचार आला की आज आपण हत्तीना भेटावयाचे विसरलो त्यामुळे मी रिक्षाने परत येऊन त्या हत्तींना भेटलो. त्यांना न सांगताच जाण्याबद्दल क्षमा मागितली. त्यावर त्यांनी सोंडा वर केल्या, मला आनंद झाला व गाडी मिळून माझा प्रवास सुखरूप झाला.

त्या काळातला आणखी एक अनुभव म्हणजे मी अंधेरीहून गिरगांवला खोलीवर रात्री झोपण्यास जात असे व त्यावेळी शॉर्टकट म्हणून मरिनलाइन्सला उतरुन सोनापूर मार्गे बाहेर पडत असे. एकदा रात्री घराजवळ गेल्यावर लक्षात आले की माझ्या खिशात चावी नसून खिशाला भोक पडले आहे. विचार करता असे लक्षात आले की सोनापूरमधून जात असतांना एके ठिकाणी काहीतरी पडल्याचा आवाज आला होता. कदाचित तिथेच चावी पडली असावी. या विचाराने मी परत त्या ठिकाणी आलो. सगळीकडे अंधार होता. माझ्याजवळ विजेरीही नव्हती. त्या ठिकाणी उभे राहून मी तिथे असणाऱ्या आत्म्यांना आवाहन केले की जर माझी चावी इथे असेल तर ती कृपा करुन मला परत द्या. आणि अंधारातच मी उभा असल्या जागी वाकून खाली हात लावला आणि आश्चर्य म्हणजे चावी हातास लागली. तिथल्या अदृश्य आत्म्यांचे आभार मानले व घरी येऊन आरामात झोपलो.

भवन्स जर्नलमध्ये चिन्मयानंदाबद्दलच्या गोष्टी यायच्या. त्यातील एक वाक्य होत “Endless endlessness is the end of all endeavour unending end is the end. Try with effort. हे वाक्य मी बऱ्याचदा M.A. with English घेतल्यामुळे फुशारक्या मारणाऱ्यांना सांगायचो व त्याचा अर्थ विचारयचो तसेच त्यांचे प्रवचन चालू असतांना प्रतिध्वनी यायचा त्यामुळे त्यांच्या एका शिष्याने विचारले. स्वामीजी why there is an echo स्वामीजी said in his style that These are the words returned unlistened (Apposite to the stage there were quarters of Govt. officers)

८. महालक्ष्मी

ताडदेवला माझे कार्यालय असल्यामुळे मी नियमीतपणे महालक्ष्मीच्या दर्शनाला जात असे व खणानारळाची ओटी घेत असे. खरे तर सुरवातीला यातील महालक्ष्मी कोणती महाकाली व महासरस्वती कोणती हे समजत नसे शोधक बुद्धीने विचार केल्यावर व निरीक्षण केल्यावर असे लक्षात आले की मधली महालक्ष्मी असून तिच्या उजव्या हाताला महाकाली व डाव्यास महासरस्वती आहे. असेच एकदा ओटी घेऊन पायऱ्या चढत असता असे शब्द कानावर पडले की अरे आम्ही तिघी आहोत. मला माझी चूक उमगली व तेव्हापासून मी तीन ओट्या न्यायला लागलो व दर तीन वर्षांनी तिघीनांही साड्या अर्पण करु लागलो. साधारणत: लाल रंगाची महाकालीस हिरवी महालक्ष्मीला व पांढरी महासरस्वतीला व त्या साड्या ज्या दिवशी नेसवणार असतील त्या दिवशी पहाटे सहा वाजता मंदिरात जाऊन मी पहात असे.

महालक्ष्मी स्तोत्र वाचायला लागल्यावर ज्या वेळी साड्या अर्पण करुन त्यांना नेसवल्यावर मी पहावयास गेलो तेव्हा मला आश्चर्य व आनंद वाटला. कारण त्या दिवशी महालक्ष्मीला पांढरी साडी नेसवली होती व मी म्हणत असलेल्या स्तोत्रामधे, श्वेतांबरधरा, असाच उलेख आहे. आजही मी ते व्रत पाळत आहे.

९. नर्मदा स्तोत्र व कपिल गीता

गो. नी. दांडेकरांचे - कोण्या एकाची भ्रमण गाथा - वाचले. त्यामध्ये नर्मदा स्तोत्राचा उल्लेख प्रथम वाचला. त्यानंतर नाना पालकर लिखित श्री. गोळवलकगुरुजीचे चरित्र वाचतांना नर्मदा स्तोत्राचा परत उल्लेख आला .त्यामुळे मी हे नर्मदा स्तोत्र काय आहे व मला कुठे मिळेल या दृष्टीने पाठपुरावा करु लागलो. करता करता दीड वर्षानंतर एकाने मला सांगितले की ते तुला देईन तू ते लिहून घे. त्याप्रमाणे मी ते लिहून घेतले व दररोज म्हणू लागलो. त्याचा परिणाम असा की दोन वर्षानंतर मला नर्मदा स्नान घडले.

स्नान केल्यावर एकदा असा विचार आला की आपण जे स्नान करतो ते बाह्य स्नान झाले. आंतरिक स्नान कसे होईल? हा विचार असतांना माझ्या हातात अनायसे कपिलगीता आली व त्यामध्ये देखील एका मुनीने कपिल ऋषींना हा प्रश्न विचारला व त्यानंतर त्यांनी त्याबद्दलचे श्लोक सांगितले.

१०. भीमाशंकर

असेच एकदा भीमाशंकरला जाण्याचे ठरविले. कोणीतरी म्हणाले की सकाळी जाऊन संध्याकाळी परत येता येते. त्यामुळे मी व माझा मित्र व्ही. टी स्टेशनला पोहचलो. आम्ही पोचण्यापूर्वीच कर्जत लोकल निघून गेल्यामुळे दुसऱ्या कर्जत लोकलपर्यंत वाट पहावी लागली. कर्जतला पोचल्यावर कर्जतहून खांडसला एस्. टी. ने पोचलो. तिथून चढून भीमाशंकरला जाता येते हे ऐकलेले असल्याने आम्ही तिथे गेलो. परंतु एक गाडी चुकल्याने खांडसला पोहचण्यास चार वाजले. तरी आम्ही चढण्यास सुरुवात केली. सप्टेंबरचे दिवस असल्याने सूर्यास्त लवकर झाला काळोखही पडला व पाऊस पडू लागला. चढल्याने इतकी तहान लागली की तिथल्या झऱ्याचे पाणी प्यायलो.

एका ठिकाणी आल्यावर कसे जायचे हे माहीत नव्हते. बर जवळपास दुसरे कोणीही नव्हते. मित्र म्हणाला आता आपण काय करावयाचे? मी म्हटले थांब मी हाक मारतो कुणी तरी येईलच. त्याप्रमाणे मी हाक मारल्यावर हातात काठी खांद्यावर पिशवी अशा अवस्थेत एक गावकरी पुढे आला. त्याला आम्ही विचारले की भीमाशंकरला कसे जावे? तो म्हणाला मला त्यापुढील गावातच जायचे आहे त्यामुळे तुम्ही माझ्याबरोबरच चला.

अंधार इतका वाढला की पुढचे काहीच दिसेना. आता काय करावयाचे? त्यावर आम्हाला भेटलेला माणूस म्हणाला आपण मशाल बनवू व त्याप्रमाणे त्याने एका झाडाची फांदी तोडली माझ्या मित्राने खिशातला रुमाल बांधला व मी माझ्याजवळील आगपेटीने त्याला काडी लावली. परंतु जेमतेम दोन पावलावरच तो रुमाल पूर्ण जळून गेला. त्यावर आमच्या बरोबरचा माणूस म्हणाला आपण एक युक्ती करु. त्याने त्याच्या खांद्यावरच्या पिशवीतून एक टेरेलीनची पँट काढली व त्याचा एक पाय फाडून तो काठीस बांधला. मी काडी लावताच उजेड पडला.

यानंतर पढे तो हातात काठी घेऊन त्याच्या खांद्यावर हात ठेऊन मित्र व मित्राच्या खांद्यावर हात ठेऊन मी असा प्रवास सुरु झाला.

गाव दिसल्यावर त्याने सांगितले हे आले भीमाशंकर, आणि त्यानंतर आम्ही पाहतो तर तो गृहस्थ आम्हास कुठेच दिसेना. त्यानंतर आम्ही भीमाशंकरचे दर्शन घेतले व एका घराच्या पडवीत आसरा घेतला. त्या गृहस्थाने आम्हाला जेवू घातले व झोपण्याचीही सोय केली. दुसऱ्या दिवशी स्नानादी आवरुन परत जेव्हा आम्ही पाहिले तेव्हा आता उतरुन जायची हिंमत आमच्यात नव्हती. त्यामुळे तिथून मुंबईची एस्. टी. पकडून आम्ही संध्याकाळी घरी आलो. त्या अनोळखी व्यक्तीचेही आभार व आमची ओळखही नसतांना आम्हाला आसरा व जेवणखाण दिल्याबद्दल त्या व्यक्तीचेही आभार. त्याने आमचे व आम्हीही त्याचे नावगावही विचारले नाही. त्यावेळेस आजच्या सारखे मोबाईल नव्हते. त्यामुळे आज परत येणार म्हणून दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही पोहचलो. परंतु भीमाशंकरला जाणार हे माहीत असल्यामुळे घरी कुणी फारशी काळजी केली नाही.

११. अमावास्या

फार पूर्वीपासून मी दर अमावस्येला शिधा दक्षिणा देत असे. संक्रांतीनंतरच्या एका अवसेला असा विचार आला आपण सर्वांना तिळगुळ देतो तर आपल्या पितरांना कां देऊ नये. त्यामुळे मी तिळगुळाची एक स्वतंत्र पुडी करुन शिधेबरोबर अवसवालीला दिली. असाच विचार माझा मुलगा दहावी पास झाल्यावर आला. आपण सर्वांना पेढे देतो मग आपल्या पितरांनाही का देऊ नये. त्यामुळे त्यावेळी अवसवालीला शिधेबरोबर पेढ्यांचा खोकाही दिला.

१९८१ साली मी औरंगाबादला असतांना असे मनात आले की एकादशी व द्वादशीला गजानन महाराजांच्या पोथीचे वाचन करावे. त्यामुळे मुंबईहून निघतांना मी बॅगेमध्ये पोथी घेऊन निघालो होतो. प्रवासात सर्वसाधारणपणे मी झोपतो. त्यामुळे आमची एस्. टी. शिरुरजवळ खड्यात पडली व ड्रायव्हरच्या केबीनलाच आग लागली होती. इतर प्रवाशांच्या आरडा ओरडीमुळे मला जाग आली व मी चटकन खाली उतरलो. (त्यावेळी सरकारी अधिकाऱ्यांना १ ते ५ क्रमांकाच्या आसनांवर प्राधान्य मिळत असे) खाली उतरल्यावर लक्षात आले की माझी बॅग आतच आहे. म्हणून मी परत चढलो व बॅग काढली. चालकाच्या कॅबीनमधून आगीच्या ज्वाला येत होत्या. परंतु आश्चर्य म्हणजे त्या बॅगेपर्यंत पोचल्या नव्हत्या. वास्ताविक एस.टी.त शिरल्याबरोबरच उजव्या हाताला वरच्या रॅकमध्ये पहिलीच माझी बॅग होती. मी सुखरूप वाचलोच पण पोथीमुळे बॅगही वाचली. या विलक्षण अनुभवाने उत्साहाने ठरल्याप्रमाणे दशमी ते द्वादशीला पारायण केले.

१२. स्वप्नातील वेगळे अनुभव

माझी पत्नी अत्यंत आजारी होती. ७५वरुन तिचे वजन ४२ वर आले होते. पहाणाऱ्यांना वाटायचे की ही आता जास्त काळ काढत नाही. तिच्या आजारपणात एक दिवस स्वप्नात माझ्या जन्माच्या वेळी माझी जी आत्या आली होती तिला मी दरवाज्यात पाहिले. मी तिला विचारले तू का आलीस तुझे काय काम त्यावर ती म्हणाली की मला समजले की तुझी बायको आजारी आहे, त्यामुळे तिला पहावयास मी आले आहे. (ती आत्या १० वर्षापूर्वीच निवर्तली होती.) त्याच आठवड्यामध्ये स्वप्नात दरवाजाची बेल वाजली म्हणून मी दार उघडले तर दारात माझा मोठा भाऊ उभा होता. (त्याचेही निधन झाले होते) मी त्याला विचारले तुझे काय काम आहे? तू का आलास. त्यावरतो म्हणाला वहिनीची प्रकृती बरी नाही असे समजले म्हणून तिच्या प्रकृतीची विचारपूस करण्यास आलो आहे.

स्वप्नांच्या संदर्भातील आणखी एक गोष्ट नमूद करायची म्हणजे माझ्या मावशीचे माझ्यावर फार प्रम होते. परिस्थितीने इंटरनंतर मी कॉलेजला न जाता घरीच आहे हे कळल्यावर तिने स्वत: पैसे देऊन माझे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. ज्या ज्या वेळेस मी अडचणीत असे त्या त्या वेळी ती स्वप्नात आली की दुसऱ्या दिवशी माझी अडचण दूर होत असे. असे एकदोनदा झाल्यावर अडचणीच्या वेळी मावशी स्वप्नात आली की मी निर्धास्त असे.

तसेच एकदा मोठी आर्थिक अडचण होती व आता कसे काय करायचे हा माझ्यापुढे प्रश्न होता. त्यावेळी माझे वडील स्वप्नात आले व त्यांनी कोटाच्या खिशातून नोटांचे बंडल काढून मला दिले व म्हणाले चिंता करु नकोस. पूर्वानुभवामुळे मला खात्रीच होती की ही अडचण दर होणार. (व त्याप्रमाणे ती झालीही.)

माझे वडील २७ मे १९७३ रोजी गेले. त्यावेळी फारसे समजत नसल्याने मी २७ मे लाच स्मृतिदिन पाळत असे. ब्राह्मणास घरी बोलावून दान असे. ७/८ वर्षे झाल्यावर एक दिवस वडील स्वप्नात आले व म्हणाले की अरे जे तारखेला करतोस ते तिथीला कर. त्यानंतर मी तिथी शोधून काढली व आता दरवर्षी त्या तिथीला त्यांचा स्मृतिदिन करतो.

औरंगाबादला असतांना एकदा स्वप्नात मी घरी येऊन बेल वाजवली. आईने दार उघडले आणि त्यानंतर स्वप्नावस्था संपली. मी खरेच घरी आलो होतो का हे पाहण्याकरिता मी मुंबईला आल्यावर आईला विचारले की अमक्या दिवशी मी आल्याचा तुला भास झाला का? त्यावर आई म्हणाली की बेल वाजवल्याने मी दार उघडले व मला तुझा भास झाला.

तसेच मी ८३-८४ मध्ये प्रथम आमचे कुलदैवत कोळिसरे येथे जाऊन आल्यावर मोठा भाऊ आई वगैरे सर्व मंडळी तेथे गेली. चाळीस वर्षानंतर प्रथमच आई तिच्या माहेरी गेली. आल्यावर तिने मला सांगितले की काल स्वप्नात तुझे वडील आले होते. ते म्हणाले की तुझ्यामुळे मला कुलदेवतेचे दर्शन झाले.

तसेच माझे लग्न झाल्यावर साधारण दोन वर्षांनी ती एकदा स्वप्नात आली व म्हणाली की तुझे गिरगावातील रेशन कार्डावरील नाव काढून घे व ते इथे नोंद कर. दुसऱ्या दिवशी मी ऑफीसला न जाता ते काम प्रथम केले. त्याचप्रमाणे गिरगावातील खोली विकण्यासंदर्भात मी आईवडिलांना सांगितले. कारण मूलतः ही खोली वडिलांना त्यांच्या मालकाने

दिली होती. त्या दोघांकडूनही स्वप्नात संकेत मिळाल्यानंतर मी खोली मालकाला परत देण्याचे निश्चित केले. त्या दिवशी सकाळी स्वप्नात आई पैशाच्या दोन बॅगा घेऊन आल्याचे दिसले. मी त्याच दिवशी मालकाकडे जाऊन व्यवहार पूर्ण केला व पैसे सर्व भावंडांना एका आठवड्यात समान देऊन टाकले.

माझे मावस भाऊ म.रा.प.वि.म. मध्ये उच्च पदावर होते. काही कारणाने त्यांच्यावर ठपका ठेवला गेला व त्यांना काढून टाकले व ही बातमी पेपरातही आली. आई म्हणाली तू जाऊन त्यांना भेट. पण मी विचार केला इतक्या उच्च पदस्थ व्यक्तीला माझ्यासारख्याने भेटून काय होणार. त्याच रात्री माझी मावशी स्वप्नात आलो व मला म्हणाली तू त्याला जाऊन भेट. त्यानुसार दुसऱ्या दिवशी कार्यालयात न जाता मी त्याला भेटलो. व मी का आलो तेही सांगितले.

स्वप्नांत मला जे दृश्य दिसले होते. तेच मी त्याच्या घरी गेल्यावर मला दिसले. त्याला खूप आश्चर्य वाटले. तो म्हणाला माझी आई माझ्या स्वप्नात न येता तुझ्या स्वप्नात कशी आली?

मी ६३ साली पुण्यात असतांना मला एका रात्री माझा आतेभाऊ मुंडन केलेला दिसला. नंतर चौकशी करता असे कळले की माझी मोठी आत्या स्वर्गवासी झाली होती. तसेच मी औरंगाबादला (१९८१) असतांना एका रात्री स्वप्नात मी माझ्या मित्रासह स्मशानात गेलो आहे असे दिसले. मुंबईला आल्यावर कळले की मित्राच्या आईचे निधन झाले आहे.

आज पहाटे स्वप्नात मी गिरगांवातील जगन्नाथ चाळीतील माझ्या मित्राच्या घरी जाण्यासाठी त्यांच्या जिन्यापाशी उभा असतांना अचानक मला ४/५ कुत्र्यांनी मला घेराव घातला. स्वप्नातच मी मनाशी म्हटले की ते काही मला चावणार नाहीत पण मला वर जाऊ देत नाहीत. त्यातील एक मोठा काळा कुत्रा होता. मी अचानक हात वर करुन, जय गुरुदेव दत्त, म्हटल्यावर ती कुत्री निघून जाऊ लागली. त्यांनी निघता निघता एक कुत्रे दुसऱ्या कुत्र्याला विचारत होते की त्याला जाऊ कसे दिले त्यावर दुसरा कुत्रा म्हणाला काय करणार त्याने गुरुदेव दत्त म्हटल्याने सगळेच संपले.

त्यानंतर मी वर गेलो तर मित्राच्या जागी एक गुजराथी कुटुंब होते. त्यातील दोन मुलींनी माझे स्वागत केले. पण मित्र नसल्याने मी लगेच निघालो. नंतर मी दुसऱ्या मित्राला विचारले असता तो म्हणाला की तू म्हणतोस ते बरोबर जागा एका गुजराथी कुटुंबाला विकली असून त्याला दोन मुली आहेत.

मला पडलेला प्रश्न म्हणजे कुत्र्यांची भाषा मला कशी समजली! पहाटे स्वप्न पडले स्वप्नात प्रथम ७/८ जण आले ते गेल्यावर दुसरा एक गट , त्यातील २/३ जण कोपऱ्यात जाऊन वाद्य वाजवत बसले मग तेही गेले. गंमत म्हणजे प्रत्येकाने काहीना काही खाऊ आणला होता व तो उघडून पहात असता त्यात मंत्रालयम् येथील राघवेन्द्र स्वामीच्या मठातील प्रसाद होता. दोन दिवसापूर्वीच राघवेंद्र स्वामीच्या मठात नवग्रह पूजेकरिता सौच्या नावे मी पैसे दिले होते. त्यांनी सकाळी प्रसाद घेण्याकरिता बोलावले होते. परंतु सौ. सकाळी येण्यास तयार नव्हती. संध्याकाळी गेल्यावर ते म्हणाले की प्रसाद सकाळीच झाला. हां पण थांबा तुमच्या नवग्रहाचे लॉकेट घेऊन जा. माझ्या मनाला चुटपुट लागून राहिली. परंतु वरील स्वप्नाने त्याचे निरसन झाले.

स्वप्नात असे दिसले की मी गच्चीवर असून चंद्राच्या पुढील छायेकडे पाहत आहे. तेवढ्यात चंद्र त्या छायेजवळ आला ती छाया एक मानवाकृती होती. त्या आकृतीने सांगितले की शुक्रवारचा दिवस तुला चांगला आहे. चंद्रापुढील छायेचे चित्र मी स्वप्नातच पेपरातील फोटोशी ताडून पाहिले. जाग आल्यावर विचार केला असता असे वाटले की उद्याचे सूर्यग्रहण हे कर्क राशीत आहे व माझ्या राशीस ते अनिष्ट आहे असे वाचल्यामुळे कदाचित subconscious level वर ते पोहचले असल्यामुळे ईश्वरी शक्तीने ती भीती दूर केली असेल व दुसरे म्हणजे एखाद्या व्यक्तीला तुम्ही चांगला सल्ला (परमार्थाकडे जाणारा) दिला असेल तरी ती ईश्वरी शक्ती तुमच्या मागे उभी राहते.

मी माझ्या मित्राला फोन करुन सांगितले की स्वप्नामधे तो मला घेऊन एका सत्पुरुषाकडे गेला व त्यांच्या पाया पडण्यास मी पुढे झालो असता बसलेल्या स्थितीत असतांना त्यांनी आपला उजवा पाय पुढे केला. त्याला हे सांगितल्यावर त्याला खूपच आनंद झाला व म्हणाला की सध्या मी ओझर व लेण्याद्री करुन मोरगावला जात आहे.

१३. ब्रह्मविद्या

मी २००५ पासून ब्रह्मविद्येच्या प्रगत अभ्यासक्रमास सुरुवात केली व शिक्षक म्हणून आदरणीय श्री फडके सर होते. पहिल्याच दिवशीचा वर्गाचा अनभव असा की प्रार्थना म्हणतांना मला असे वाटले की एखाद्या ड्रेनेज पाईपमधून जशी घाण बाहेर पडते तशी घाण माझ्यातून बाहेर पडत आहे. आज सकाळी ध्यानाला बसलो असता ध्यान संपण्यापूर्वी एक डास कानाजवळ येऊन बाजूच्या केसावर बसला. मी मनात ठरविले की ध्यान संपल्यावरच त्याच्याकडे बघायचे. त्याच वेळी असेही ठरविले की त्याला जाणीवपूर्वक हकलायचा आहे. (माझ्या स्मरणात बुद्धाने कानावरची माशी उडवली ती गोष्ट होती.) ध्यान संपल्यावर मी जाणीवपूर्वक माझा हात कानाजवळ नेला तेव्हा डासाने उडण्यापूर्वी जे पंख फडफडवले ते ऐकू आले. तो बिचारा न चावताच गेला.

आज वर्गात प्रार्थना म्हणतांना मी प्रेमळ आहे हे म्हणत असतां डोळयासमोर गाईचे वासरू तिच्या आचळाला लुचत असलेले पाहिले व ती गाय त्याकडे पाहत आहे असे दिसले. प्रेमळ या शब्दाचे याहून अधिक चांगले यथार्थ चित्र असू शकेल असे मला वाटत नाही. आज फडके सरांना मी विचारले की चिंतन व मनन याचा अर्थ / फरक काय? तर त्यांनी सांगितले एकाच विषयावरील विविध वाचनविचार-संदर्भ म्हणजे चिंतन व एकाच विषयावर मनाने सतत विचार करत राहाणे म्हणजे मनन.

त्यांनी एक सुंदर गोष्ट सांगितली. एक जण अन्नछत्र चालवित होता. बरेच लोक येऊन जेवून जात असत. एके दिवशी तो आपल्या शिष्याला म्हणाला हे काम तू पहा. त्यावर शिष्य म्हणाला महाराज इथे बरेच लोक नुसते भगवे कपडे घालून जेवून जातात ते खरे साधू नाहीत. त्यावर महाराज म्हणाले अरे तुला कसे समजले खरे नाहीत म्हणून. मी आजवर कधी या गोष्टीचा विचारच केला नाही. या भोंदूंमध्ये एक जरी खरा साधू जेवून गेला तरी त्याच्या आशीर्वादाने सर्व काही चालेल. बरेच भोंदू जेवून गेले तरी हरकत नाही पण एक सच्चा बिनाभोजन जाता कामा नये हे लक्षात ठेव.

शतं निहाय दातव्यं सहस्रं स्नानमाचरेत् ।

लक्षं निहाय भोक्तव्यं कोटिं त्यक्त्वा हरिं स्मरेत्।।

दान करतांना शंभर कामे बाजूस ठेऊनही दान करावे, स्नानाच्या वेळेस हजार कामे तहकूब ठेऊन स्नान करावे. तसेच भूक लागेल तेव्हा लाखो कामे बाजूस सारुन जेवावे व भगवंताचे स्मरण कोट्यावधी कामे बाजूस सारुन करावे. (कारण क्षणभंगूर देहाचा यत्किंचितही भरवसा नाही. कोण जाणे घटके नंतर काय हाईल?)

आज चैतन्याच्या महासागरात मी विरघळून जात आहे हे म्हणतांना त्यातला, मी, चा वेगळाच अर्थ उमगला. मी म्हणजे स्वाभिमान अहं अहंकार इत्यादी. हे खरंतर केवढे असावे तर मिठाएवढे, चवीपुरते गरजे पुरते. अतिरेक नको अन्यथा पदार्थ बिघडतो. त्याच वेळी विचार आला की कदाचित् मीठामधील मी मुळेच त्याला मीठपण प्राप्त झाले असावे.

आज सकाळी असे लक्षात आले की शरीरातील डोक्यापासून पायापर्यंत ज्या निरनिराळ्या यंत्रणा सतत कार्यरत असतात त्यामुळे आपण आपले जीवन जगू शकतो, त्यांच्या प्रति आपण आजवर काहीच कृतज्ञता व्यक्त केली नाही. किंबहुना आपण कृतघ्न आहोत. देव लांब राहिला परंतु हे जे सतत घडत असते, त्याबद्दल आपण जराही फिकीर केली नाही.

१४. लालबागच्या गणपतीचा अनुभव

आज सकाळी घरुन निघतांना लालबागच्या राजाचे दर्शन घ्यायचे असे ठरवून त्याला द्यायची वस्तू घेऊन कामाच्या ठिकाणी निघालो होतो. वास्तविक एका कॅन्सर पेशंटला देण्यासाठी माझ्या मित्राने मला १०,००० . ० ० रुपये दिले होते. परंतु त्या व्यक्तीने त्याला पैशांची गरज नाही असे सांगितल्याने एक तोळ्याची चेन लालबागच्या गणपतीला द्यावी असे माझ्या मनांत आले. त्याप्रमाणे आवश्यक ती भर घालून मी एक तोळयाची साखळी घेतली होती. निघण्यापूर्वी मनोमन गणेशाची प्रार्थना करुन ११ वाजता मी लोअर परेलच्या माझ्या कार्यालयातून निघालो. लालबागला पोहचण्यास १५ मिनिटे लागली. पहातो तर तेथे प्रचंड रांगा होत्या. नवसाची वेगळी नवस फेडणाऱ्यांची वेगळी व नुसत्याच दर्शनेच्छूची वेगळी. मी रांगेत उभा राहिलो असतो तर किमान ८ तास तरी लागले असते. धीर धरुन एका पोलीस ऑफीसरला विचारले. त्याने अडसर दूर करुन मला मार्ग करुन दिला व मी थेट गणपतीच्या पुढेच पोहचलो. मला जे द्यायचे होते ते कार्यकर्त्यांच्या हातात देऊन त्याला सोन्यासाठीच्या हुंडीत टाकण्यास सांगून दर्शन घेतले व बाहेर पडलो. व साडेबाराला माझ्या कार्यालयात परतलो. एवढ्या प्रचंड गर्दीतून मी कसा काय परतलो हे मलाच समजेना. हा चमत्कार की गणरायाची कृपा?

१५. रुद्राक्षाच्या कथा

आज सकाळी ८.१५च्या सुमारास म. गांधी रस्त्यावरील पतंजली केंद्राच्या दुकानाबाहेर एक साधू बसला होता. पांढरी लुगी पांढरी बंडी व कपाळी चंदनाचा टिळा गळयात तुळशीची माळ. आज आईची जन्म शताब्दी असल्याचे लक्षात आल्याने त्याला दहा रुपये दिले. त्यांनी आशीर्वाद घ्यायला बसायला सांगितले. त्याप्रमाणे केले असता त्याने मीच दिलेली नोट त्रिकोणी घड्या करुन माझ्या हातात देत हात बंद करायला सांगितले. त्यानंतर त्यावर स्वत:चा हात ठेवून काही मंत्र म्हटले व मला हात उघडण्यास सांगितले. तेव्हा हातात एक पंचमुखी रुद्राक्ष होता. तो रुद्राक्ष त्याने त्याला उदबत्ती दाखवून लाल दोऱ्यात उजव्या दंडात १५ दिवस बांधावयास सांगितले व त्यानंतर मंगळवारी गाईला ५ केळी देण्यास सांगितले. मला मिळालेला हा दुसरा पंचमुखी रुद्राक्ष.

पहिला रुद्राक्ष कसा मिळाला त्याची कथा. २००३ साली पावसाळयाच्या दिवसात मी गोरेगांवच्या रेल्वे पुलावरुन गाडी पकडण्यासाठी जात असता अचानक एक साधू समोर आला व त्याने हात दाखवून थांब असे सांगितले. मी नेहमीप्रमाणे खिशातील पैसे काढून त्यास दिले व नमस्कार केला. त्याने आशीर्वाद देऊन मला एक रुद्राक्ष व फूल दिले. गंमत म्हणजे ऐन गर्दीची वेळ असूनही त्यावेळी पुलावर एकही माणूस नव्हता. मी नमस्कार करुन गाडी पकडून कामावर गेलो. घरी आल्यावर रुद्राक्ष व फूल कपाटात ठेवले. त्यानंतर २-३ महिन्यांनी एक समर्थ भक्त माझ्याकडे त्याच्या प्रॉपर्टीसंबंधात प्रश्न विचारण्यास आले होते. आमचे बोलणे चालू असतांना सौ. चहा देण्यास आली असता नुसते तिच्याकडे पाहून तिच्या माहेरच्या भौगोलिक परिस्थितीचे यथार्थ वर्णन केले. मला काय वाटले कुणास ठाऊक मी म्हंटले मला एक रुद्राक्ष मिळाला आहे तो मी वापरावा किंवा कसे? त्यावर त्यांनी म्हटले कुठे आहे तो रुद्राक्ष. मी कपाटातून काढून त्यांच्या हातावर ठेवताच त्यांनी दोन क्षण डोळे मिटले व ज्यावेळी तो मला मिळाला ती तारीख वार व वेळ सांगितली व मला सांगितले की गुरुपुष्यामृतास तो देवापुढे ठेव व दुसऱ्या गुरुपुष्यामृताला तो गळयात घाल. योगायोग असा की त्यावेळी एकाच महिन्यात दोन वेळा गुरुपुष्यामृत योग होता. त्यामुळे त्वरीतच महिन्याभरात मी तो गळयात धारण केला व अजूनही तो गळयात आहे.

१६. लक्षात राहिलेले उपास

उपवासावरचे एक पुस्तक वाचत असतांना मी अनुभवलेले व राहिलेले तीन उपास म्हणजे -

१) १९८१ मधे औरंगाबादला मी लॉजवर राहत होतो. महाशिवरात्रीच्या दिवशी आज उपास कसा करावयाचा हा विचार करत असतांनाच लॉजच्या मालकाने मला बोलाविले व सांगितले की आज तुम्हाला माझ्याबरोबर फराळाकरिता घरी यायचे आहे. त्याप्रमाणे मी घरी गेलो असता माझ्यासमोर जे फराळचे ताट आले ते पाहून किमान दोन दिवस तरी जेवण्याची गरज नाही असे वाटले.

२) १९८६ मध्ये धुळे येथे असतांना कार्तिकी एकादशी आली. रजा नसल्याने मी कामावरच होतो. मनात म्हटले की दुपारी लस्सी पिऊन राहावे. एक वाजण्याच्या सुमारास अचानक माझ्या कॅबीनमधे आमच्या येथील मुख्य-निरीक्षक आला. मी त्याला म्हटले की आज तुमचा वार नसतांना तुम्ही इथे कसे काय? तेव्हा तो म्हणाला की तुम्हाला फराळासाठी घरी नेण्यासाठी मी आलो आहे. त्याने त्याच्या गाडीवरुन मला त्याच्या घरी नेले. घरी गेल्यावर हात-पाय धुऊन टेबलाजवळ बसलो. माझ्यापुढे फराळचे भरलेले ताट ठेवण्यात आले. मी त्यास म्हटले तुम्हीही बसा त्यावर तो म्हणाला की तुम्ही फराळ केल्याशिवाय मी फराळ करणार नाही. पांडुरंगाचे आभार मानून मी फराळ केला.

३) २०१५ च्या महाशिवरात्रीला यावेळी उपास करावयाचा नाही असे ठरवले होते. परंतु शिवरात्रीच्या दोन दिवस पूर्वीच एकीचा फोन आला की काका तुम्ही शिवरात्रीला आमच्याकडेच या. ती गुजराथी असल्याने उपासाचा प्रश्नच येणार नाही असे मला वाटले होते. परंतु तिच्या घरी गेल्यावर पाहतो तर सर्वच पदार्थ उपवासाचे होते. अशीच एक घटना मी धुळे येथे असतांना घडली. काही कारणामुळे अचानक धुळे बंदची हाकाटी झाल्याने संपूर्ण धुळे बंद होते. मी हॉटेलवर होतो. बाहेर जाण्यात काहीच अर्थ नव्हता. मी हॉटेलवाल्याला सांगितले की दुपारी मला चहा व पाव पाठव. त्यावर तो म्हणाला चहा मिळेल पावाचे काही सांगता येत नाही. म्हटले ठीक आहे. असे म्हणून मी कॉटवर आडवा झालो. पाऊणच्या सुमारास बेल वाजली. वेटर चहा घेऊन आला असेल म्हणून दार उघडले. पहातो तो आमचा एक निरीक्षक दरवाजात उभा होता. त्याला विचारले तू इथे कसा ? त्यावर तो म्हणाला आज सर्व बंद आहे मग तुम्ही कुठे जेवणार म्हणून मी डबा घेऊन आलो आहे व आश्चर्य म्हणजे त्याने वरण, भात, भाजी, पापड, कुरडई व खापरावरची पुरण पोळी आणली होती. ते सर्व पाहून परमेश्वराच्या अगाध लीलेचे कौतुक करण्यापलीकडे माझ्याकडे काहीच नव्हते.

१७. कालदर्पणाकडे

१९६३ च्या दिवाळीपूर्वी दम्याच्या विकारांमुळे वडिलांना नोकरी (पूर्णपणे खाजगी असलेली) सोडावी लागली. कुटुंब मोठे श्री शिल्लक काही नाही फंड पेन्शन काही नाही. त्यामुळे बारिकसारीक खर्चासाठीही पूर्णत: परावलंबी त्यांची ही स्थिती पाहिल्यावर जेव्हा मी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षात शिकत होतो. विचार आला की उद्या आपलेही वय झाल्यावर आपल्यावर अशी वेळ येऊ नये याकरिता आतापासूनच आपण काहीतरी व्यवस्था करायला हवी. नोकरीनंतर निवृत्ती अनिवार्य आहे. त्यामुळे अशी काहीतरी विद्या आपल्याला अवगत हवी की ज्यामुळे निवृत्तीनंतरचा काळही चांगल्याप्रकारे व्यतीत हाईल. पूर्ण विचार करुन ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्याचे ठरविले. सुरवात पंचांग कसे पहायचे ते वडिलांकडून शिकून घेतले. नंतर ज्योतिर्मयूख हा ग्रंथ आणून अभ्यास सुरु केला व आजपर्यंत अखंडीतपणे चालूच आहे. वडील निवर्तल्यानंतर आईने एकदा विचारले की माझे किती वय उरलय त्यावर मी सांगितले ज्योतिषशास्त्रात मृत्यू सांगण्यास निषेध/प्रतिबंध आहे. त्यामुळे तुझे आयुष्य नक्की किती हे मी सांगू शकत नाही. परंतु तू १७ जुलैला जाशील हे नक्की. हे मी कोणत्या आधारे सांगितले हे मला आजही सांगता येणार नाही. आश्चर्य म्हणजे १९९३ सालच्या १७ जुलैलाच तिचे निधन झाले.

याच संदभात घडलेली आणखी एक घटना म्हणजे मी रहात असलेल्या जागेत पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे सार्वजिनक शौचालय होते. त्यामुळे आईला घरी आणण्याच्या दृष्टीने मी घरात शौचालय असलेल्या आधुनिक जागेच्या शोधात होतो. माझी पत्नी व माझे सासरे हे सातत्याने त्या प्रयत्नात होते. एक दिवस पत्नीने विचारले आम्ही इतके प्रयत्न करतोय तर आपल्याला जागा मिळणार तरी कधी. तुम्ही एवढ्या लोकांना सांगता मग मला का सांगत नाही? त्यावर तिला सांगितले की तुला ऐकायला त्रास होईल परंतु घरातील एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याखेरीज आपल्याला जागा मिळणार नाही. आश्चर्य म्हणजे आईला अग्नी देऊन घरी येत असतानाच वाटेत सध्या राहत असलेल्या जागेचा, बिल्डर भेटला व म्हणाला तुम्हाला जागा हवी आहे ना? उद्या पैसे भरा. मी त्यास आता कुठून येत आहे ते सांगितले व किमान १५ दिवस तरी तुम्हाला भेटता येणार नाही. परंतु पैसे भरण्याची व्यवस्था करतो. त्याप्रमाणे मी सासऱ्यांना सांगितले व त्यांनी ते काम केले.

ज्योतिष शिकतांना केवळ अभ्यास करणे वेळ चांगला जाऊन सत्कारणी लागणे इतकाच उद्देश. अर्थाजन हा उद्देश कधीच नव्हता. पण म्हणतात ना निरपेक्षपणे केलेली कोणतीही कृती फलदायीच होते. ४/५ वर्षापर्यंत मी कोणताही मोबदला घेत नसे. परंतु ५ वर्षापूर्वी आषाढी एकादशीच्या दिवशी माझा पूर्व परिचय नसलेली एक व्यक्ती भेटली व मी करत असलेल्या उपासनेसंबंधी सांगितले त्यावरुन ती व्यक्ती विशेष अधिकारी आहे असे मला जाणवले. त्यांनी सांगितले की आजवर तुम्ही ज्योतिष-सल्याचा मोबदला घेत नाही हे मी जाणतो. पण यापुढे तुम्ही मागू नका पण स्वेच्छेने कुणी काही दिल्यास अव्हेरु नका. तेव्हापासून मी कोणी काही दिल्यास स्वीकारतो कारण न घेण्यामागची भूमिका अशी की मी जे काही सांगतो त्याचा-, बोलविता धनी, -वेगळाच असतो. त्याचे मूल्य मी कसे घेणार?

१८. अन्य घटना, अनुभव व विचार

कन्यागत पर्व म्हणजे गुरु ग्रहाने कन्या राशीत प्रवेश केला की नरसिंहवाडी येथे असलेल्या कृष्णा वेणी नदीला भेटायला गंगा येते. त्यामुळे तिथे कन्यागत पर्व वर्षभर म्हणजे गुरु तुळेत जाईपर्यंत असते. त्यानिमित्त काढलेला विशेषांकात एक मजेदार वाक्य आढळले. कीर्ती ही कुवांरी आहे; कारण ज्यांना ती हवी असते त्यांच्याकडे ती जात नाही व ज्यांच्याकडे जावे असे तिला वाटते ते तिच्यापासून दूर पळतात. त्यामुळे तिचा धनी कोणीच होत नाही. म्हणून ती कुवारी आहे.

एक दिवस अचानक प्रारंभी ‘विनती करु गणपती’ हा श्लोक म्हणत होतो. त्यातील चिंता क्लेश दरिद्र दु:ख अवघे देशांतरा पाठवी, या ओळीवर विचार करतांना असे मनात आले की खरोखरच या गोष्टीना परदेशी पाठवले तर मला परदेशी जायची गरजच काय?

आज सकाळी पूजा आटोपल्यावर आठ वाजता दारावरील बेल वाजली. दार उघडल्यावर बाहेर एक माणूस उभा होता. पांढरे धोतर, बंद गळ्याचा झब्बा वर्ण सावळा कपाळावर गंध व डोक्यावर पांढरी टोपी, जय साईबाबा, म्हणाला मी म्हटले एक मिनिट थांब, कालची देवापुढची दक्षिणा घेतली व उंबरठ्याबाहेर येऊन हात जोडून त्याला दिली व पाया पडलो. ती व्यक्ती म्हणाली लवकरच तुझ्या हातून एक मोठे कार्य होणार आहे. सर्व व्यवस्था आपोआप होइल काळजी करु नको. परत एकदा शिर्डीला जाण्याचा योग आहे. तुला शनीची बाधा होती ती आता नाही. तू भोळा आहेस. चटकन दुसऱ्यावर विश्वास ठेवतोस. मनातली गोष्ट बोलू नकोस. हनुमान चालिसा वाच. याउप्पर एकही शब्द न बोलता तो निघून गेला. जाण्यापूर्वी त्याच्या हातातले पुस्तक उघडून गुरुचे दर्शन घे असे म्हणाला. मी पाहिले व नमस्कार केला. कोण ? काय ? मला काही माहीत नाही. माझ्या घराखेरीज दुसऱ्या कोणत्याही घरी तो गेला नाही. मी दिवसभर या गोष्टीवर विचार करत होतो की काही न मागता केवळ तू हनुमान चालीसा वाच हे सांगण्यासाठीच का आला होता. तेव्हा विचार असा आला की कोणीतरी हितचिंतकाने त्याला माझ्याकडे पाठविले असावे. हे लक्षात येताच मी ताबडतोप हनुमान चालीसा वाचावयास सुरवात केली. आजतागायत मी ते म्हणतो आहे.

सरकारी कामगार अधिकाऱ्याची पदोन्नती मिळाल्यावर मी औरंगाबादला जायला निघालो त्यावेळी आईने मला दोन गोष्टी सांगितल्या.

१) दिवसभरात असे कोणतेही काम करु नकोस ज्यामुळे तुला रात्री झोप येणार नाही.

२) स्वत:ला सांभाळ व इतरांना यश दे.

या वाक्याचा अर्थ समजायला मला वयाची पन्नाशी गाठावी लागली.

ती आणखीही एक म्हण सांगत असे की माणसाने नदी आधी वहाणा काढाव्यात. याचाही अर्थ कळण्यास खूप वेळ लागला.

आज सकाळी ध्यानाला बसलो असता अचानक उजव्या मांडीच्या मध्यावर मागील बाजूस जोरात कोणी प्राणी कडकडून चावत आहेसे जाणवले निमिषभर तसाच राहिलो. तेवढ्यात सपूर्ण अंगातून एक लहर गेली व भ्रूमध्यात काहीतरी होत आहेसे जाणवले. त्याच वेळी मांडीला चावण्याची जाणीव प्रकर्षाने होत होती. म्हणून थांबून जाणीवपूर्वक त्या ठिकाणी हात लावून पाहिले तर त्या ठिकाणी साधी मुंगी सुद्धा नव्हती. तेव्हा कर्णाची मांडी फुटल्याची तसेच जालंदरनाथाजवळ गोपिचंदाची आई असता मांडी फुटल्याची गोष्ट आठवली.

आज माझ्या घरी एक सद्गृहस्थ आले त्यांनी एक सुंदर गोष्ट सांगितली. दोन जिवलग मित्र प्रवास करत होते. वाटेत भांडण झाल्यामुळे एकाने दुसऱ्याच्या थोबाडीत मारली. त्याने वाळूत लिहून ठेवले की माझ्या जिवलग मित्राने माझ्या तोंडात मारली. पुढे गेल्यावर तो खड्यात पडला. तेव्हा दुसऱ्या मित्राने त्याला वाचवले. त्यानंतर त्याने दगडावर कोरुन ठेवले की माझ्या जिवलग मित्राने माझे प्राण वाचवले. पहिल्या मित्राने विचारले की मगाशी तू वाळूत लिहिलेस मग आता तू दगडात का कोरलेस. त्यावर त्याने सांगितले की पहिली घटना सामान्य व क्षणिक आहे, परंतु प्राण वाचवण्याची घटना फार मोठी आहे.

आरे रोड येथील अंबामाता मंदिरात नवीन वास्तू बांधून कलशारोहणा निमित्ताने श्री घाग नृसिंह वाडी यांचे कीर्तन होते. उत्तर रंगात नामाचा महिमा सांगणारे कथानक त्यांनी सांगितले. शिव हा हलाहलाची आग शमविण्याकरिता रामनामाचा जप करीत होते. तेव्हा पार्वतीने विचारले तुम्ही कुणाचे नाव घेत आहात? व रामाचे असे सांगताच ती हसू लागली. कारण राम त्यावेळी सीतेचा शोध घेत फिरत होता. शून्य नजरेने चालत होता. इकडे तिकडे पहात नव्हता. त्यावर खूप जुन्या काव्यामध्ये कवीने म्हटले आहे की जान्हवी ही धरित्रीची मुलगी त्यामुळे तिला पळवल्याने आपल्या सासूकडे कोणत्या तोंडाने पाहणार (म्हणून खाली पहात होता.) व वर कुलपती सूर्य महाराज (राम सूर्यवंशी असल्याने) रागाने पाहत होते. आमच्या कुळात येऊन तू हे काय केलेस? त्यामुळे रामाला वरही पाहता येत नव्हते व म्हणून तो शून्यात नजर ठेवून चालत होता. परीक्षा घेण्याच्या उद्देशाने दाक्षायणी जानकीच्या रुपात उभी राहिली तरी ती रामाला दिसली नाही. व लक्ष्मणाने सांगितल्यावर रामाने ताबडतोब ओळखले व म्हणाला तू का आलीस? त्यावरुनच तुकाई किवा सध्याची तुळजाभवानी तिला ओळखल्याने तिने रामाला वर दिला म्हणून ती रामवरदायिनी झाली.

सुमारे वर्षापूर्वी (२००४ साली) माझ्या मित्राच्या पत्रिकेवरुन दक्षिण व पश्चिम दिशेमध्ये एखादा दर्गा असल्यास पहा व असल्यास जाऊन चादर चढव असे त्याला सांगितले होते. या वर्षी तो परत आला असता मी त्याला तीच गोष्ट परत सांगितली. त्याने जाऊन पाहिले असता एक दर्गा असल्याचे आढळले. त्यानंतर तो सपत्निक दर्ग्यावर जाऊन चादर चढवून आला. ५ मिनीटांनेच त्याच्या कॉलनीतील एकाचा फोन आला व त्याने त्याला घरी बोलावले व साईबाबांची एक मोठी तसबीर दिली. तो म्हणाला १५ दिवसांपूर्वीच मी शिर्डीला गेलो होतो व ही तसबीर घेतांनाच ती तुला द्यावी असे मनात आले. दर्ग्याला जाऊन आल्यावर पाचच मिनीटांनी साईबाबांची मोठी तसबीर घरी येणे व ते ही गुरुवारी यामुळे माझा मित्र आश्चर्यचकित झाला व ताबडतोब फोन करुन त्याने हे मला सांगितले. या घटनेनंतर त्याची आई म्हणाली लहानपणी तुला खूप डांस चावत असत. काय उपाय करावा या विचारात असतांनाच एक दिवस तांदूळ निवडत असता त्यात एक साईबाबाचे लॉकेट सापडले. तेच तुझ्या गळयात बांधल्यावर तुझा त्रास कमी झाला.

हरताळ-उपधातू विशेष खनिज द्रव्य-पूर्वीचे लेखक पक्क्या शाईने लिहित व त्यात काही गैर लिहिले गेले असल्यास शाई पक्की असल्याने निघत नसे म्हणून त्यावर हरताळाने खोडून तेवढा लेख झाकत असत. हरताळ फासणे वा खोडून टाकणे-रद्द करणे.

शंकराच्या वीणेला, निलंबा, सरस्वती-कच्छपी, नारद-महती, गणाच्याप्रभावती, विश्वावसु-बृहती, तुंबरु-कलावती म्हणतात. कु म्हणजे खोटी-मिथ्या अशी जी संसारमाया तिचा संग-कुसंगी. संग परमेश्वरी!

आज सकाळी पूजा संपल्यावर एक वयस्कर बाई घरी आल्या. त्यांना नमस्कार केला. तेव्हा त्यांनी तोंड भरुन आशीर्वाद दिला. तेव्हा त्यांचे वय ८० हून अधिकच होते. त्या अजूनही सगळीकडे एकट्याच फिरतात. व अजूनही आनंदी असतात. त्या म्हणाल्या माझे कुठेही अडत नाही. Full adjustment वर adjustment आहे म्हणून मनाला खेदही नाही. मी देवाचे काहीही करत नाही पण गेली २३ वर्षे बाबा माझ्या बरोबर असतात. (साई बाबा) मला निघायचे असेल तेव्हा मी बाबांना सांगते, बाबा माझा हात धरतात आणि मी सगळीकडे बिनधास्त फिरते. माझे सुखदु:ख आपत्ती जे काही असेल ते मी त्यांना सांगते. एका दिवाळीत ते माझ्याकडे फराळ करुन गेले. बरेच अनुभव आहेत, परत आले की सांगेन असे सांगून त्या उठल्या. त्या बाई दिसल्याबरोबर त्यांना नमस्कार करावा असे मला का वाटले त्याचा उलगडा त्यांच्या बोलण्यामुळे झाला. ज्या शक्तीच्या सान्निध्यात सतत आहेत अथवा जी शक्ती त्यांच्या सोबत नेहमी आहे त्या शक्तीना नमस्कार.

माणसाला अग्नी हा वानराकडून मिळाला. वानराकडे डोळयांनी अग्नी शोषण करण्याची ताकद असते. सरपण गोळा करणाऱ्यांना ते माहीत असते. काटक्यांतील अग्नी शोषलेला असतो त्या काही केल्या जळत नाहीत. त्यांना, वानर काटक्या, म्हणतात. तसेच अस्वल पावसाळ्यातील बेगमी म्हणून मध पिऊन पाणी पिऊन त्याच्या गुहेबाहेरील सपाट दगडावर ओतून (अर्थात त्यांची लाळ त्यात मिसळत नाही हे वैशिष्टय) व उन्हात ते कडक झाल्यावर पौष्टिक पेय म्हणून वापरतात. काही आदिवासी त्या गोष्टीच्या मागावर असतात पण त्या प्रयत्नात ते आपले डोळे फोडून घेतात.

एकदा गाडीमध्ये बसलो असता विचार आला की, श्रीराम जयराम जय जय राम, यात प्रत्येक शब्दात राम आहे. मात्र एकदा श्री, एकदा जय व एकदा जय जय का? आणि उत्तर मिळाले. श्रीराम-शारीरिक पातळीवर, जय हे मानसिक पातळीवर, व जय जय राम हे आध्यात्मिक पातळीवर. मग विचार करु लागलो हा आताच प्रश्न व त्याचे उत्तर का मिळाले. तेव्हा लक्षात आले की माझा सह प्रवासी हे श्री गोंदवलेकर महाराजांचे भक्त असून गाडीत सुद्धा डोळे मिटून त्यांचा जप चालूच असतो. त्यांच्या सांनिध्याचा परिणाम.

रुद्रवीणा हे भारतीय वाद्यामधले अतिशय जुने वाद्य. २४ तारांचे हे वाद्य उचलावयास दोन माणसे लागतात. उस्ताद मोहिउद्दीन डागर हे बीन किवा रुद्रवीणाचे उस्ताद. त्या आधी महम्मद हुसेन रविबक्ष अलिहुसेन चलपली चिट्टीबाबू आणि प्रथमनाथ चट्टोपाध्याय हे रुद्रवीणेवर प्रभुत्व असलेले विख्यात गायक. अखंड कोसळणाऱ्या पाण्याच्या प्रपाताच्या काठावर असलेल्या विशिष्ट प्रकारच्या झाडाला समंत्रक आमंत्रण द्यायचे ते झाड अर्धेच कापायचे आणि नंतर ६ महिन्यांनी कापून त्याची वीणा करावयाची. या प्रक्रियेत प्रपाताच्या कोसळण्याचे नाद आणि आघाताचे तरंग

त्या झाडाच्या कणाकणात रुजतात. खोलवर जाऊन त्या झाडाला स्पंदमय करतात मग त्या झाडाची वीणाही अपूर्व अशी स्पंदने छेडते.

आयुष्यात आपली मर्यादा आपणच आखून घ्यायची आणि तृप्त रहायच. कदाचित या वृत्तीमुळे आपली प्रगती थोडीशी खुंटेलही पण आयुष्यात काही काळानंतर ही समाधानी वृत्ती असणे फार आवश्यक असते. म्हणजे मन:शांती मिळते. आपल्याला जे आवडते ते काम करणे म्हणजे स्वातंत्र्य आणि आपण जे काही करतो ते आपल्याला आवडणे हाच आनंद.

सकाळी ९.२६ च्या गाडीच्या वेळेस आतून एकदम प्रवासी आल्याने मी फ्लाटफॉर्मवर पूर्णपणे पाठीवर पडलो. पण एक पांढरी शर्ट पँट घातलेल्या व दाढी असलेल्या व्यक्तीने मला लगेच सावरले. व प्रथम काय केले तर पायापासून पाठीपर्यंतची धूळ झटकली. मी थोडा वेळ बाकावर बसलो तेव्हा विचार केला की मी अलगद पडलो. पडतांना व वर उठतांना शरीर फार हलके होते. प्रथमच मनाशी म्हटले की ज्या जमिनीने मला इतकी वर्षे सावरले आहे तर तिने थोडी गंमत केली असेल. म्हणून मी हसून मनोमन त्या जागेला प्रणाम केला. व ज्याने मला सावरले त्याचे आभार मानले.

हक्क आणि कर्तव्य यावर विचार करतांना असे वाटले की हक्कामुळे माणूस उद्धट उर्मट बनतो की काय? हक्का करताच लोक भांडतात खून मारामाऱ्या कोर्ट कचेऱ्या या सर्व गोष्टी हक्क मिळविण्याकरता होतात. हक्क न मिळाल्याने न्यूनत्वाची भावना निर्माण होते. या उलट कर्तव्य केल्याने समाधान लाभते. मानसिक शांतता मिळते व मला तर असे वाटते की सततच्या कर्तव्यपूर्तीमुळे काही वेळा हक्काच्या पलिकडील विशेषाधिकार माणसास प्राप्त होतात. पण माणूस हक्काकरिता भांडतो. कर्तव्य करण्याचा आग्रह धरत नाही. हक्क म्हणजे काय? तर अधिकार आणि अधिकार म्हणजे श्रेष्ठत्व. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. हे बरोबर आहे. पण ते स्वराज्य टिकावे यासाठी करावी लागणारी कर्तव्ये किती जणांना माहीत आहेत व ते ती कशी करतात? हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे वाटते.

सकाळी जाग येताच एका सूक्ष्म विचाराने आठवण करुन दिली की आजपासून गंगादशहरा प्रारंभ आहे. हा विचार देणाऱ्याला प्रणाम. बेस्ट कॉलनीतील गजानन महाराजांच्या देवळात डॉ. प्रामाणिक यांच्या अंगात गजानन महाराजांचा संचार होतो हे कळल्याने मी व माझा चुलत मेहणा त्यांच्या दर्शनाला गेलो. दर्शन झाले. त्यांच्या पाया पडलो व नमस्कार केला. आम्ही बाहेर आल्यावर मेव्हणा म्हणाला की, गण गण गणात बोते, याचा अर्थ काय? मी म्हटले तू हे म्हणत रहा अर्थ तुलाच समजेल. यावरुन त्याला देवकी परमानंदम् बद्दल सांगितले.

परमानंद म्हणजे श्रेष्ठ अत्युच्य आनंद असा अर्थ तू करणार. पण जेव्हां कृष्ण जन्म घेणार त्यावेळी देवांनी अगोदर जाऊन देवकीला सांगितले की तुझ्यापोटी कृष्ण जन्म घेणार आहे. त्यावेळी तिला आनंद झाला परंतु प्रत्यक्ष कृष्णाने जेव्हा सांगितले की फक्त आताच नव्हे तर जेव्हा जेव्हा मी जन्म घेईन त्यावेळी तूच माझी आई असशील (तुझ्याच पोटी जन्मेन) हे ऐकल्यावर देवकीला जो काही आनंद झाला तो, परमानंद. म्हणून हा शब्द देवकीच्या बाबतीतच योग्य आहे व तो तिलाच लागू होतो.

मुलाचे फिजिक्स पॅक्टीकल सुरु झाले त्या दिवशी त्याने घरी येऊन सांगितले. आज अगोदर नारळ वाढवून त्याचा प्रसाद आम्हा सर्वांना दिला व नंतरच आमचे पॅक्टीकल सुरु झाले. सायन्सच्या प्रयोग शाळेत हल्लीच्या काळात घडणारी ही घटना अत्यंत बोलकी आहे असे मला वाटते.

सकाळी दूरदर्शनच्या कार्यक्रमात ऐकले की रामाने जांबुवंतालाच का विचारले की रावण सीतेला कोणत्या दिशेला घेऊन गेला? कारण त्याच्याकडे चक्षुस्मृति विद्या होती म्हणजे जे पाहिले ते लक्षात ठेवण्याची कला/विद्या तसेच कृष्ण अर्जुनाला गीता सांगत असतांना त्याचे एक बोट, तर्जनी, पुढे दिसते तर ज्ञानेश्वर मात्र ज्ञानेश्वरी सांगातांना त्याचे दोन्ही हात वर असतात. कारण ते लोकांना समजाऊन सांगत असतात. हा देह बोलीचा फरक आहे.

चित्शक्ती विलास (ले. धनंजय देशपांडे) वाचत असतांना त्यात असे वाचले की योग्यांनी सुगंधी फुले धारण करावीत. कारण योगाग्नीमुळे होणारा दाह सुगंधी पुष्पांनी व अत्तराने कमी होतो. त्यावेळी दोन वर्षापूर्वी महाराष्ट्रातल्या सर्व देवतांना मी हिना किंवा खस हे अत्तर अर्पण केले होते.

आज अनुभव वाचताना अचानक हंस शब्दाचा अर्थ ध्यानात आला. सोऽहम् आणि हंसः सः अहं समजले. हे हंस: हे समजले पाहिजे. म्हणूनच सगळे परमहंस होत नाहीत.

परळ येथील नेहमीच्या प्रसादाच्या दुकानाबाहेर उंच शिडशिडीत वयस्कर लांब कफनी परिधान केलेला व डोक्यास साईबाबांसारखा रुमाल बांधलेला एक साधू उभा होता. त्याला काय हवे या विचाराने मी जवळ गेलो असता अत्यंत हळू व नम्र स्वरात कांदाभजी असे त्याने सांगितले. मी ती घेऊन त्यास देत असतांना तो तोंडाने काहीतरी म्हणत होता व उजवा हात वर प्रदानांच्या स्थितीत होता. मी त्यास भज्या बरोबर जी काही नाणी आली तीही दिली. आशीर्वाद देत तो झपझप निघून गेला. त्याचे डोळे अतिशय तेजस्वी होते. तेव्हा लक्षात आले. आज गुरुवार आहे.

एकदा मी कुर्ला येथील नाथपंथी गृहस्थांना भेटावयास गेलो. त्यांनी त्यांच्या गावी नवनाथ मंदिर उभारले आहे. त्यांच्याकडच्या एका फोटोत त्यांच्यात उतरत असलेली प्रकाशाची शलाका स्पष्टपणे आलेली पाहिली. गुरु ज्योतिर्मयानंदांच्या (ब्रह्मविद्या) फोटोनंतर आज दुसरा फोटो असा पाहिला ज्यामध्ये प्रकाश स्पष्टपणे दिसत आहे. त्यांचा आशीर्वाद घेऊन तेथून निघालो. हे माझे रेल्वेतील सहप्रवासी श्री दळवी यांच्या कृपेमुळे झाले.

माझे मित्र श्री दळवी यांनी दिलेली भालचंद्र महाराजांच्या पोथीचा २६ वा अध्याय मी वाचत होतो. अध्याय वाचून झाला देवीची आरती केली. बाहेर हॉलमध्ये माझा मुलगा, त्याचा मित्र व पत्नी होती. त्यांना अचानक सिगरेटचा वास आला. मी गप्प राहिलो. खात्री केली घराबाहेर पाहिले पण काहीच नाही. पण घरात मात्र धुराशिवाय सिगरेटचा वास भरुन राहिला होता. त्यानंतर घरातल्यांना सांगितले की महाराज येऊन गेल्याची खूण आहे. दहा मिनिटानंतर तो वास गेला. त्या सर्वाना प्रथमच ही गोष्ट अनुभवण्यास मिळाली. मला हे प्रथम माहीत नव्हते. पण श्री दळवी ही गोष्ट माझ्याजवळ बोलले होते. त्यामुळे मला हे कळले.

आज असा विचार आला की आपले गुरु म्हणजे सेकंद काटा. ते अखंड कार्यरत असतात तेव्हा कुठे मिनीट काट्याच्या वेगाने आम्हाला काही वाटू लागते व प्रत्यक्षात तास काट्याच्या वेगाने कृती होते. हा विचार आमच्या ब्रह्मविद्येच्या फडके सरांना सांगितल्या. त्यांनी पाठीवर थाप मारुन शाबासकी दिली.

तसेच असाही विचार आला की गुरु ग्रह वक्री असो वा मार्गी आपले गुरु सरळ आहेत.

तसेच नित्याप्रमाणे जमिनीवर सर्व अंग सैल सोडून (शवासनात) पडलो असता पृथ्वीला क्षमा का म्हणतात ते लक्षात आले व त्यावरुन क्षमता, सक्षम, या शब्दांचा उलगडा झाला.

एकदा श्री दळवी यांनी मला जाममिल बाजूच्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील श्री सातपुते (शाम) भालचंद्र गुरुचरित्राचे लेखकाच्या घरी नेले. ते नव्हते पण त्यांच्या कुटुंबाने चहा दिला. खाली उतरताच ते भेटले व त्यांच्याबरोबरच जेथे भालचंद्र महाराजांचे देहावसान झाले तेथे गेलो नंतर गणेश गल्लीजवळील भालचंद्र स्मृतीमंदिरालाही भेट दिली. श्री दळवी यांना त्यांची पोथी पेढे व नारळासह दिली.

एकदा पहाटे ध्यानात असतांना अचानक **'शान्ति'** या शब्दाचा असा अर्थ जाणवला की **शम्अन्ति** ज्याचा शेवट कल्याणात आहे. कारण **शं** म्हणजे कल्याण म्हणूनच **शं करोति इति शंकर** असे म्हटले आहे. त्यामुळेच गुरुने दिलेला आशीर्वाद **'शांती सदैव तुमच्या सोबत असो'** याचा अर्थ किंचित किंचित लक्षात आला.

प्रसिद्ध रहस्यकथा लेखक श्री बाबूराव अर्नाळकर यांनी लिहिलेले भगवान् नित्यानंद यांचे चरित्र वाचण्यात आले व फारच आश्चर्य वाटले. त्यांच्या चरित्रातील एक उलेख वाचून फारच आश्चर्य वाटले. तो असा की दक्षिण कॅनरा जिल्ह्यामध्ये कानन उर्फ कांञ्चनगड नावाचा इतिहास प्रसिद्ध किल्ला आहे त्याच्या पायथ्याशी घोर अरण्य होते. तेथे श्री नित्यानंदांनी एका प्रचंड दगडामध्ये ४३ गुहा तयार केल्या. प्रत्येक गुहेत एका माणसाला व्यवस्थित ध्यानधारणा करता येईल इतकी जागा आहे. हा प्रचंड दगड सजीव आहे. त्यातील कोणत्याही गुहेत बसल्यावर पाषाणाचा श्वासोच्छवास ऐकू येतो.

सर्वान् प्रकृतिविकारान् अवधुनोति, इति अवधूतः।

म्हणजे ज्याने सर्व प्रकृतिविकाराचा त्याग केला आहे तो अवधूत. श्री गोरक्षनाथांनी सिद्धसिद्धांत पद्धतीमध्ये अवधुताची लक्षणे सांगताना म्हटले आहे की

यो विलङ्घ्याश्रमान् वर्णान् आत्मन्येव स्थितः पुमान्

अतिवर्णाश्रमी योगी अवधूतः स उच्यते ।।

जो सर्व वर्णाश्रमधर्म ओलांडून केवळ आत्मस्वरुपात स्थिर झालेला असतो तो अतिवर्णाश्रमी योगी अवधूत या नावाने संबोधला जातो. जगाच्या द्वैतबद्धीने संचार करणारा अवधूत जगाच्या बंधनाच्या पलिकडे असतो तो कोणत्याही भौतिक सत्तेला जुमानत नाही. विचार त्याला स्पर्शू शकत नसल्याने विकारी दृष्टीतून जाणवणारी बंधनेही तो मानीत नसतो. दण्डधाऱ्यांनाही दंडनीय ठरविण्याची शक्ती त्याच्या ठायी वास करीत असते. मुक्तीने त्याला स्वेच्छेने वरलेले

असते सकाम जनाची उपाधी टाळण्यासाठी अवधूत नेहमी विपरिताचाराचा अवलंब करतात. लौकिक दृष्टीला निषिद्ध भासणाऱ्या गोष्टी आचरतात.

प्रत्येक अनुभव हा साक्षात्कार असतोच असे नाही. ती जाणीवेच्या बाह्य घटकाशी- प्रसंगाशी झालेली एकरुपता असते, आणि अनुभवाचा क्षण संपला की ती स्मृतीमध्ये परावर्तित होते.पण साक्षात्कार म्हणजे अनुभवातला गाभा बोधाच्या रुपाने हृदयात प्रगट होणे.

ध्यानाला बसलो असता असा विचार आला की पाश्चात्य लोक ज्याला नॅनो टेक्नॉलाजीबद्दल बोलतात व त्या वरील प्रयोग चालू आहेत ते लाखो वर्षापूर्वीच आम्ही अदृश्य तंत्रज्ञानाने शोधून काढले आहे. We have discovered the invisible technology which cures everything that is meditation ध्यान. त्यावेळी invisible शब्दावर विचार करतांना असे लक्षात जाल को visible in हा त्याचा नवीन अर्थ आहे. व त्याच वेळी श्री मधु दंडवते आमचे प्रोफेसर यांनी ४० वर्षापूर्वी सांगितलेले वाक्य आठवले. त्यांना विचारले What is mind तर ते म्हणाले it does not matter यावर त्यांना विचारले What is matter यावर ते म्हणाले never mind.

एकदा सौ. ने प्रश्न केला की ज्ञानेश्वरांच्या वडिलांनी संन्यास घेतला असताना परत ते गृहस्थाश्रमात कसे आले? त्यावर मी म्हटले की विठ्ठलपंतांनी गुरुंना माहीत होते की यांच्या पोटी निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई सारखी जगाचे कल्याण करणारी मुले जन्म घेणार आहेत. त्यामुळे त्यांनी प्रचलित नियमाविरुद्ध आदेश दिला व तो विठ्ठलपंतांनी तो पाळला. प्रचलित नियमाविरुद्ध वागण्याचे बाळकडू ज्ञानेश्वरांना त्यांच्या वडिलांकडून मिळाले. त्यामुळे ज्ञानेश्वरी लिहून त्यांनी गुरुशिष्य परंपरा मोडीत काढली. व भागवत धर्म स्थापन केला. खरे तर विठ्ठलपंत व ज्ञानेश्वर यांनी नियम मोडून जगाचे कल्याणच केले आहे असे मला वाटते. विठ्ठलपंतांनी जर गृहस्थाश्रम स्वीकारला नसता तर? ज्ञानेश्वरी म्हणजे ईश्वरी ज्ञान. ज्ञान ही ईश्वराचीच देणगी आहे. हे जगाला कळलेच नसते.

एकदा पहाटे जाग आली असता जाग खूपच लवकर आल्याने परत झोपण्याचा विचार आला. त्याच वेळी असा विचार आला की जाग आल्यावर परत झोपणे म्हणजे जी शक्ती आपल्याला जागे करते तिचा अवमान केल्यासारखेच होय. हा विचार आल्यावर सरळ उठलो व अभ्यासाला बसलो.

दुपारी प्रार्थना करतांना असा विचार आला की मी सर्व ज्ञानेंद्रियांना नमस्कार करुन ही शुद्ध होऊ दे असे म्हणतो. पण ती स्वत: तर काहीच करत नाहीत त्यांच्या द्वारा मनच सर्व करीत असते व मन शुद्ध होऊ दे असे मी म्हणतच नाही. माझे मनही शुद्ध होऊ दे असेही मी म्हटले पाहिजे. किंबहुना तशी प्रार्थना केली पाहिजे.

एकदा पहाटे ३ वाजता जाग आली आणि मला समजाविण्यात आले त्यामुळे ज्या एका विचाराचा काटा मनांत खुपत होता तो काढण्यास मदत झाली. त्यावेळी मला मी वाचलेल्या एका गोष्टीची आठवण झाली.

जंगलात रात्र झालेली पाऊस कोसळतोय आणि अशा स्थितीत असलेल्या व्यक्तीला दूरवर एक झोपडी दिसते. तो तिथे जाऊन झोपडीचे दार ठोठावतो. झोपडीतील व्यक्ती त्याला आत घेऊन आदराने बसवते व म्हणते मी आताच भोजनाला बसणार होतो. आता तूही ये. पहिली व्यक्ती म्हणते बरे झाले मला फार भूक लागली आहे. त्यावर

झोपडीनिवासी व्यक्ती म्हणते हरकत नाही. आपण देवाची प्रार्थना करुया व जेवायला बसू. त्यावर आलेली व्यक्ती म्हणते मी नास्तिक आहे. मी प्रार्थना करणार नाही. झोपडीवासीने खूप समजाविले. पण ही व्यक्ती प्रार्थना न करण्याबद्दल ठाम होती. त्यामुळे झोपडीतील व्यक्तीने त्या व्यक्तीला हाकलून देऊन झोपडीचे दार बंद केले. त्याचवेळी आकाशवाणी झाली. हो तो नास्तिक असूनही मी आजवर सांभाळले. तुझ्याकडे एकवेळ पाठवले तर त सांभाळू शकत नाहीस? मला वाटले तू माझा जवळचा भक्त आहेस?

बरेचदा स्वप्नामधे अधांतरी तरंगण्याचा अनुभव मला आलेला आहे. सुरवातीला भीती वाटायची नंतर सवय झाली. परंतु त्या तरंगण्यावर माझे नियंत्रण नसे. खूप दिवसानंतर एकदा मी असाच अधांतरी फिरत होतो. तेव्हा लक्षात आले यावेळचे फिरणे हे अतिसहज व पूर्णपणे माझ्या नियंत्रणात आहे.

मनात एखादा असा विचार आला की तो आपल्या स्मृतिचा सदस्य होतो.त्यामुळे जेव्हा आपल्याला एखादी गोष्ट वा विचार आठवावा ळागतो तेव्हा त्याला आपण re-member म्हणतो. 20 आज एका स्त्रीला पाहिल्यावर ती चांगली आहे असे वाटल्याने विचार आला की डोळे जे समोर येते ते दाखवितात त्यावर चांगल्या वाईटाची मल्लीनाथी बुद्धी करते त्यामुळे दिसते ते फक्त पहाणे त्यावर विचार करायचा नाही हे तत्व कान, नाक, जीभ, व त्वचा याबाबतही आहे. कदाचित म्हणूनच बुद्धीला अविद्या म्हणत असावेत.

महाकाली अष्टकामधे इंद्र उवाच असे आहे.

त्याबद्दलची कथा :- ब्राह्म मुहूर्तावर आकाशगंगेतील देवांची ये-जा असते. एकदा असेच नारदमुनी जात असता त्यांना भगवान् विष्णू भेटले. त्यांनी प्रसन्न होऊन आपल्या भक्ताला स्वत:च्या गळ्यातील वैजयंती माला दिली. नारद नि:स्पृह त्याने ती इंद्राला दिली. इंद्राला वाटले मी देवांचा राजा मला याचे काय मोल? म्हणून त्याने ती ऐरावताच्या गळ्यात घातली. हे पाहून लक्ष्मी कोपली. इंद्राचे सर्व वर्चस्व नाहीसे झाले. तेव्हा विष्णूच्या चरणी गेला. विष्णू म्हणाले तू मातेची आराधना कर. आता मी काही करु शकत नाही. तेव्हा इंद्राने भक्तीने प्रेमाने मातेचे पाय धरले. हे पाहून मातेचे डोळ्यातून दोन आसवे इंद्राच्या डोक्यावर पडली. त्यावेळी इंद्राला जेर स्फुरले तेच महालक्ष्मी स्तोत्र. म्हणून त्याची सुरुवात इंद्र उवाच अशी आहे.

आमच्या येथे गोरेगावला अंगठ्याच्या ठशावरुन भविष्य सांगणारे एक गृहस्थ आले. कुतूहल म्हणून मी त्यांना माझ्या अंगट्याचा ठसा दिला. त्यांनी सांगितले की तू गगनगिरी महाराजांचे दर्शन घे. आजवर मी त्यांना कधीच भेटलो नव्हतो ते कुठे आहेत याचा शोध घेउन खोपोलीतील त्यांच्या आश्रमाचा फोन मिळवून खोपोलीला त्यांच्या आश्रमात गेलो. आश्चर्य म्हणजे सिद्धार्थनगर मधील एक गृहस्थ तिथे भेटले. महाराजांचे दर्शन झाले. ते एकशे पाच वर्षांचे असून चाकाच्या खुर्चीवरुन आले. त्यांच्या मूळ प्रकृतीपेक्षा ते खूपच आक्रसलेले दिसले. आरती प्रसाद घेऊन मी घरी आलो. त्यानंतर महिन्या दीड महिन्यातच त्यांचे देहावसान झाल्याचे वाचले. हे समजल्यावर झालेल्या दर्शनाबद्दल खूपच आनंद झाला.

असाच विचार करतांना असे वाटले की प्रत्यक्ष रामाला देखील सीतेला रावणाने पळवून नेल्यावर काही करता आले नाही. तसेच श्रीकृष्णालाही त्याच्या आईवडिलांना तुरुंगातून सोडवता आले नाही. याचा अर्थ प्रत्यक्ष

परमेश्वरालाही भोग चुकले नाहीत. वरील विचार सूचण्याचे कारण, एक विनोद ऐकला तो असा एकदा एका तिकिट तपासनिसाने एकाला पकडल्यावर तो म्हणाला **जहां राम पैदा हुवे वहीसे मै आया हूँ.** त्यावर (हजरजबाबी) टी.सी. म्हणाला **ठीक है तो अब जहाँ कृष्ण पैदा हुए वहाँ चलो.**

एकदा पहाटे ४ ॥ ला जाग आली. बसून प्रार्थना करण्यापेक्षा शवासन करावे असे वाटल्याने तसे करत असता मध्येच मी अधांतरी विहार करुन आलो. मला त्यावेळी विहार करतांना मी पद्मासनात होतो हे लक्षात आले. यापूर्वी असे घडले असतांना मी कायम पोहण्याच्या स्थितीत असे.

आज एक स्त्री गरोदर असल्याने ग्रहणात तिने काय काळजी घ्यावी असे विचारण्यास आली. तिला जे सांगावयाचे ते सांगितले, दुपारी १२ पूर्वी जेवावे काळात देवाजवळ दिवा लावून नामस्मरण करावे. कोणत्याही परिस्थितीत दुपारी झोपू नये व ग्रहण टी.व्ही.वरही पाहू नये. ग्रहण कालात ग्रह एकाच रेषेत असतात. तसेच ग्रहण काल हा पुण्य काल असतो. त्यामुळे त्या काळात केलेले जप नामस्मरण इत्यादी एकाच वेळी सर्व ग्रहांवर पोचते. साधारणपणे सूर्यग्रहण म्हणजे हवा दूषित होते हे मान्य पण या इतर गोष्टी कशाला असे अनेक जण म्हणतात. पण ते लक्षात घेत नाहीत की हवा दूषित झाली असता मन स्वच्छ कसे राहील? त्या मनावरचे औदासिन्य मालिन्य झटकण्याकरता मनाला त्या काळात चांगल्या गोष्टीत गुंतवून ठेवावे हाच त्यावरचा उपाय. त्यासाठी नामस्मरण हवे असे नाही. ज्याचे ज्यात मन रमत असेल ते त्याने करावे.

गणेश चतुर्थीच्या वेळी गणपती पूजनाकरिता उपाध्याय उपलब्ध होत नाहीत त्यासाठी एका वर्षी आम्ही गणपतीपूजन कसे करावे याबाबत वर्ग चालू केले त्या वर्गामुळे खालील गोष्टी समजल्या

१) प्रथम घरातील देवाची पूजा करुन मग महागणपतीची पूजा करावी.

२) पंचगव्य (गाईचे शेण, मूत्र, दूध, दही व तूप) घेतल्यावर जीभ थोडी झिणझिणते व त्यामुळे हळवी होऊन मंत्र म्हणावयास सोपे जाते. तसेच थोडा कडवटपणा असल्याने आचमन दोन वेळा सांगितले आहे.

३) प्रथम गणपतीस स्नान घालावे व नंतर आवाहन करावे.

४) प्राणप्रतिष्ठा कल्यानंतर प्राण आले की प्रथम वाचा व मग दृष्टी येते. त्यामुळे मूर्तीने डोळे उघडल्यावर आपणच प्रथम दिसतो. म्हणून ताबडतोब, **श्री सिद्धीविनायकाय नमः**, अस म्हणून नमस्कार करावा.

५) पंचामृताचे प्रमाण दुधाच्या निम्मे दही व दह्याच्या निम्मे तूप; तूपाच्या निम्मा मध व मधाच्या निम्मे साखर.

६) विशिष्ट क्षाराच्या अशा स्थितीतच शंखाची निर्मिती होते व त्यामुळे त्या क्षाराची आपल्या शरीराला जेवढ्या प्रमाणात आवश्यकता आहे तेवढेच शंखातील पाणी पिण्याने आपणास क्षार मिळतात. म्हणून शंखातील पाणी पिण्यास सांगितले आहे.

आज दोन विचार आले. माणूस ऱ्हस्व व दीर्घ दृष्टीसाठी डोळे तपासून त्यानुसार चष्मा वापरतो. पण अंतरदृष्टी करता कोणाला दाखवावे व कोणता चष्मा वापरावा. दुसरा विचार असा आला की आज जे चिरंजीव आहेत त्यांना का चिरंजीवीपण ही शिक्षा आहे काय? कारण त्यांना मोक्ष नाही.

सारेगमप, च्या कार्यक्रमात परीक्षक म्हणून काम करतांना देवकी पंडीत यांनी विद्यार्थ्यांना तीन गोष्टी सांगितल्या.

१) आत्मविश्वास वाढवा पण तो दाखववायाची गरज नाही.

२) अभ्यास करा म्हणजे अभ्यासाच्या पलिकडचे समजेल.

३) अहंकारापासून दूर रहा.

वाईला असतांना पहाटे आवाज झाल्याने बाहेर आलो व पहिल्यांदाच पिंगुळांचे दर्शन झाले. एकजण गाणे म्हणत होता व दुसऱ्याचे हातात कंदील होता. सर्वसाधारणपणे सूर्योदयापूर्वीच्या दोन तासातच यांचे दर्शन होते व यांना पक्षांची भाषा समजते.

बालाजी तांबे यांनी सांगितलेली कथा-बिभीषणाची पत्नी ही रामभक्त होती. त्यामुळे तिने सीतेची योजना अशोकवनात केली. कारण अशोकामुळे स्त्रियांना होणारे रोग टळतात तसेच मनावर ताबा राहतो. न शोक-अशोक असे म्हटले आहे. राक्षसींच्या सहवासात एकटे राहताना मनावर संयम असणे जरुरीचे आहे. त्यात रावण एकापेक्षा एक अमीष दाखवून वश करण्याच्या प्रयत्नात असे. एकदा तर त्याने (मायेने) रामाचे शरीरच सीतेपुढे ठेवले. अशा वेळी सामान्य स्त्रीला हृदयविकाराचा झटकाच येईल, पण सीता शांत राहिली याचे कारण अशोक वृक्ष.

पौष वद्य एकादशी-निवृत्तीनाथांचा समाधी दिवस. या दिवशी ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालतात. माझ्या एका मित्रामुळे मीही प्रदक्षिणा घातली. आयुष्यात प्रथमच एवढा चाललो.

आज मोठ्या बहिणीकडे गेलो असता माझ्या जन्माच्या वेळेस जो माणूस घरी येऊन आईला वस्तू देऊन गेला तो तिला स्वप्नात दिसला. तिने जे वर्णन केले ते असे व्यक्ती उंच डोक्यावर थोडे केस मागे शेंडी व रामदासीप्रमाणेच वेश व अंगावरचे वस्त्र मांजरपाटाच्या रंगासारखे होते. आश्चर्य म्हणजे माझ्या जन्माच्या वेळी जे तिने पाहिले होते ते आजही तिला स्पष्टपणे आठवले. मी तिच्याकडे गजानन महाराजांची पोथी घेऊन गेलो होतो ती तिला दिली. तेव्हा ती म्हणाली की माझ्याकडे असलेली पोथी खूपच जीर्ण झाल्याने आता काय करावे हा प्रश्नच होता. आता तू पोथी दिल्याने आजपासून वाचावयाला सुरुवात करीन.

वरील दोन्ही गोष्टीवरुन मला असे वाटते की अशी एक शक्ती सतत वावरत असते व आपल्या चांगल्याकरिता सतत प्रयत्नशील असते व त्यानुसार आपल्या बुद्धीला सूचना मिळत असतात.

आज प्रमुख स्वामींच्या (स्वामीनारायण) उपस्थितीत भजन कीर्तनाच्या कार्यक्रमास उपस्थित राहिलो. त्यांचे वय ८९ आहे. प्रमुख स्वामींना पाहताच अचानक एक श्लोक आठवला.

गतं पापं गतं दु:खं गतं दारिद्यमेव च

आगतं सुखसम्पत्ति: पुण्याय च तव दर्शनम् ।।

एकदा सपत्निक मी चौलला देवीची ओटी भरण्यास गेलो होतो. ज्या ओळखीच्या सदगृहस्थांकडे उतरलो होतो. ते संध्याकाळी मुलांना गंगा लहरी शिकवत असत. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही देवीची ओटी भरण्यास गेलो. ओटी भरुन प्रदक्षिणा घालत असतां चाफ्याचा घमघमाट आला. मी पत्नीलाही न बोलता श्वास घेण्यास सांगितले. तिलाही तो सुगंध जाणवला. देवळात ना कुणी चाफ्याची फुले वाहिली होती वा बाहेरही विक्रेत्याकडे ती फुले होती.

तेथील दुसरा अनुभव म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही निघणार होतो. तेव्हा निघण्यापूर्वी मऊ भात जेऊन जा असे सांगण्यात आले. हे सर्व होऊन निघताना अचानक त्या कुटुंबातील कर्ती स्त्री म्हणाली थांबा मला तुमच्या पाया पडायचे आहे. असे म्हणून माझ्या पाया पडली. मी विचारले की हे काय? तेव्हा त्या म्हणाल्या याला कारण आहे ते म्हणजे आमचा कुत्रा आमच्या घरावरुन कोणी गेले तरी तो भुकतो. परंतु आपण आल्यापासून तो एकदाही भुंकला नाही. मला आश्चर्यच वाटले.

माझ्या ऑफीसमधील एका अभियंत्याकडे नाना महाराजांचे खामगावचे श्री आगाशे येत असत हे माहीत असल्याने मी शेगांवला गेल्यावर खामगावला त्यांचा पत्ता शोधून त्यांच्याकडे गेलो. ते नव्हते त्यामुळे तिथे अत्तराची बाटली ठेऊन मी आलो. त्यानंतर दोन तीनदा ते जेव्हा माझ्या अभियंत्याकडे आले तेव्हा त्यांनी माझी चौकशी केली. त्यामुळे मी हाता खालच्याला सांगितले की आता ते आले की मला सांग. ते आल्याचे कळताच त्यांना भेटावयास डोंबिवलीस गेलो त्यांना भेटलो. त्यांना भेटण्यास इतर मंडळीनी दुपारी येणार होती. मंडळी आल्यावर मीही त्यांच्या समवेत बसलो. हे पाहून स्वत: आगाशे उठून पुढे आले व म्हणाले की तुम्ही माझ्या बाजूला बसा. अन्यथा मीही खाली बसेन. नाईलाजास्तव मी त्यांच्या शेजारी बसलो. गंमत म्हणजे तिथे आधीच कुणीतरी दोन खुर्च्या आणून ठेवल्या होत्या.

तसेच माझ्या पुण्याच्या बहिणीकडे श्री गोंदवलेकर महाराजांचा कार्यक्रम होता. मी त्याला हजर होतो. त्यावेळी बेळगांवच्या काणे महाराजांचे असलेले शिष्य उपस्थित होते. ते जेवून हात धुऊन आल्यावर प्रत्येकजण आपल्या खिशातील रुमाल त्यांना देऊ लागला. मला समजेना हे काय आहे. पण ज्या ज्या रुमालाला त्यांनी हात पुसले त्या प्रत्येक रुमालाला चाफ्याचा सुगंध येत होता.

आषाढी एकादशीला एकादशीचा उपास म्हणून करण्यापेक्षा जे लाखो वारकरी तहान भूक विसरुन पांडुरंगाच्या दर्शनाला पायी जातात, त्यांना एक विनम्र व मूक अभिवादन म्हणून केल्यास काय हरकत आहे.

असाच एका एकादशीला मित्राच्या सांगण्यावरुन रात्री निघून आम्ही सकाळी पंढरपूरला चंद्रभागेत स्नान करुन रांगेत उभे राहिलो. साधारण ११/१२ च्या सुमारास माझे पाय भाजताहेत असे लक्षात आल्यावर मित्राला तसे सांगितले. त्यावर त्याने काही न बोलता पुढच्या लोकांकडे पहा असे खुणावले. माझ्यापुढे माझ्यापेक्षाही वयाने जेष्ठ सर्व लोक अनवाणीच होते. हे पाहून जणु काही त्यांची पादत्राणे माझ्या तोंडावर बसली आहे असे वाटून मी गप्प राहिलो.

माझ्या मित्राला पिट्युटरी ग्लँन्ड वाढल्याने ऑपरेशन करायला सांगितल होते. मला सांगितल्यावर मी सांगितले की मला तुझ्या पत्रिकेत ऑपरेशनचा योग दिसत नाही आणि त्याची भांडूप येथील ईश्वरानंद महाराजांशी गाठ पडली. त्यांनी त्याला नाकामध्ये औषध घालून बरे केले. त्याच्या अनुभवावरुन मीही त्यांना भेटावयास गेलो. त्यांच्यापुढे बसल्यावर एक २.५वा, ३ इंचाचा दगड ते डोक्यावर ठेवतात व धडाधड औषधे लिहू लागतात. औषध म्हणजे फक्त दोन वेळचा काढा. डोक्यावर दगड ठेवल्यावर ते बी. पी. व शुगरचे प्रमाणही सांगतात. तसेच जर व्यक्ती हजर नसेल तर त्याच्या वस्त्रावर दगड ठेऊन ते रोगनिदान करतात.

चातुर्मासात एखाद्या ग्रंथाचे वाचन करण्याचा माझा नेम आहे. त्यानुसार एका चातुर्मासात दासबोधाचे वाचन केले. वाचन पूर्ण होणार त्यादिवशी गुरुपुष्यामृत असल्याने मसुराश्रमात शिधा नेऊन दिला. त्याच दिवशी संध्याकाळी चुलत भावाचा फोन आला की आपल्याला गरुडेश्वराला जायचे आहे. त्यानुसार तिथे जाऊन नर्मदा स्नान केले व नर्मदेची ओटी भरली व कुमारी पूजनही केले. मन अतिप्रसन्न झाले. मंदिरामध्ये व समाधीस्थानात जेथे जेथे डोके ठेवले तिथे तिथे श्री क्षेत्र गाणगापूर येथे जो सुगंध येत होता तोच इथेही येत होता. त्यानंतर शूलपाणेश्वर, नारेश्वर येथील रंगावधूत स्वामी, कबीर-वड यांचेही दर्शन झाले. मला वाटते की दासबोध वाचनामुळे समर्थांनी दिलेला हा प्रसाद होता.

आज सकाळी असे लक्षात आले की शरीरातील डोक्यापासून पायापर्यंत ज्या निरनिराळ्या यंत्रणा सतत कार्यरत असतात. त्यामुळे आपण आपले जीवन जगू शकतो. त्यांच्या प्रति आपण आजवर काहीच कृतज्ञता व्यक्त केली नाही. किबहुना आपण कृतघ्न आहोत. देव लांब राहिला परंतु हे जे सतत घडत असते; त्याबद्दल आपण जराही फिकीर केली नाही.

माझ्या एका मित्राने मला नवनाथ पोथी दिली होती. ती त्यांना दाखवली व विचारले याचे काय करु ते म्हणाले ही दररोज वाचा. मी म्हटले प्रत्यक्षात (आधीच) माझा संध्या पूजा अर्चा यातच खूप वेळ जातो. हे अधिक वाचण्यात खूप वेळ जाणार. त्यावर ते म्हणाले की पूजा थोडी कमी केली तरी चालेल पण हे नियमित वाचा. त्याप्रमाणे मी आजतागायत दररोज नियमितपणे वाचन पहिल्या एकदोन वेळेस पोथी वाचून पूर्ण होताच मनाने आपले रंग दाखवा सुरुवात केली होती की उद्या शनिवार आहे, अमावस्या आहे इ.इ. पण माझ्या लक्षात आले त्यामुळे ज्या दिवशी पोथी संपेल त्या दिवशी उद्यापासन परत वाचावयाची आहे. हे लक्षात ठेवण्यासाठी मी पोथी तिथेच ठेवत असे. त्यात आणखी एक उपक्रम सुरु झाला. असेच एकदा मी सांगितले की वरुथिनी एकादशीला नवनाथांची पूजा करावी हे ऐकल्यावर नवनाथांचे मंदिर कुठे मिळणार याचा शोध सुरु झाला. पवईला एल. अॅण्ड टी. ऑफीसबाहेर नवनाथांचे मंदिर दिसले. तेव्हापासून दर वरुथिनी एकादशीस सकाळी सात वाजता तिथे जाऊन नवनाथांची यथासांग पूजा करु लागलो. या कार्यात मला माझ्या मुलुंडच्या मित्राची साथ लाभली व गेली तेरा वर्षे आम्ही ही पूजा करत आहोत.

तीन वर्षापूर्वीच्या चातुर्मासात दररोज गीतेचे तीन अध्याय म्हणायचे याप्रमाणे ठरवले व एकंदर १८ वेळा गीता पूर्ण वाचून झाली. त्यानंतर माझा मुलगा लग्नकार्यानिमित्त कलकत्याला गेला असता जगन्नाथपुरी येथे जाऊन आला व आश्चर्य म्हणजे येताना तेथील तीन मूर्तीचे असलेले चांदीचे नाणे घेऊन आला. त्याला समजले नाही पण माझ्या लक्षात आले की चातुर्मासातील गीता पठणाचा हा प्रसाद होय.

इ.स. २०१२ मध्ये तीन वेळा कणेरी मठात जाण्याचा योग आला व अर्थातच त्यामुळे अंबाबाईच्या दर्शनाचाही योग आला. मी एका वेळेस देवीला अत्तर, एकदा चाफ्याची वेणी व तिसऱ्या वेळी परत अत्तर असे दिले व आश्चर्य म्हणजे आम्ही तीन मित्र असतांना तेथील पुजाऱ्याने मला थांबवून देवीची प्रसादाची साडी दिली. तिसऱ्या वेळेस कण्हेरी मठातील महाराजांचे दर्शनही झाले.

मला कायमच एक प्रश्न पडत असे की संसर्गजन्य रोगामधे रोग्याची सेवा करणाऱ्याला तसेच ती औषधे देणाऱ्या डॉक्टरांना तो रोग का होत नाही. म्हणून एक दिवस मी माझे डॉ. मित्र कोचर यांना हा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी एक महत्त्वाची गोष्ट सांगितली ती म्हणजे रुग्णाची सेवा करणाऱ्यांमध्ये पेरेंटल हार्मोन्स तयार होतात व ते या सेवा करणाऱ्याची संभाव्य रोगापासून काळजी घेतात. असे पाश्चात्य संशोधकांनी संशोधनाअंती शोधून काढल्याचे सांगितले.

मार्च २०१२ मध्ये कुडाळला जाण्याचा योग आला. त्यावेळी पिंगुळीला गऊळ महाराजांच्या मठात गेलो होतो. दर्शन घेऊन मठाबाहेर पडत असताना तेथील सुरक्षारक्षकाने सांगितले की महाराज आज पहाटे चार वाजता आले आहेत. मी त्याला विचारले की मला त्यांना भेटता येईल का ? त्यावर तो म्हणाला हो. त्यामुळे त्यांना भेटलो. विनायक (अण्णा) महाराज. ते एकटेच होते. मी भीत भीत विचारले मी येऊ का? त्यावर खुणेनेच त्यांनी जवळ या असे सांगितले. नमस्कार केल्यावर त्यांनी डोक्यावरुन हात फिरविला व आशीर्वाद दिला. गंमत म्हणजे ज्या मित्राने मला नेले तो बाहेरच उभा होता.

१२-४-२०१२ रोजी पनवेल येथील साई मंदिरात जाण्याचा योग आला व येतांना सानपाडा येथील दत्त मंदिरात दर्शन घेतले. श्री दत्तात्रेयांनी तेथे तपश्चर्या केली होती असे सांगितले जाते.

दर वर्षीप्रमाणे याही वेळेस गंगादशहरा (ज्येष्ठ शु. प्रतिपदेपासून) दररोज गंगालहरीचे पाच श्लोक दररोज म्हणतो. परंतु यावेळी पहातो तो अष्टमीलाच ४५ श्लोक झाले होते. असे का? वास्तविक दररोज ५ प्रमाणे ४० व्हावयास हवे याचा अर्थ एखाद्या तिथीची वृद्धी झाली असावी असा विचार आला म्हणून पंचांग पाहिले असता कळले की यावेळी प्रतिपदा २ दिवस होती.

६ ऑगस्ट २०१२ रोजी अंधेरीच्या चंद्रशेखर हॉलमधे श्रीमत् परमहसपरिव्रजाकाचार्य वासुदेवानंद सरस्वती यांच्या रुद्राभिषेकात सहभागी झालो. बाबा महाराज तराणेकर (नानामहाराजांचे नातू) यांचे वाङ्मय संपदा या विषयावर व्याख्यान झाले. टेंबेस्वामींनी एकूण १६ ग्रंथ लिहिले आहेत. पञ्चभिषा या २५ श्लोकात ज्योतिषाचे सर्व सार आहे. त्यामध्ये, राहू केतू वर्ज्य व रवि, मंगळ, समस्वभावी त्यामुळे उरलेल्या पाचच ग्रहावर ते आधारित आहे. ते समजण्याकरिता परत त्यावर त्यांनी भाष्य केले आहे, असे म्हटल्याने कार्यक्रमानंतर मी महाराजांना भेटून ते मला पाठविण्याबाबत सांगितले, अजून ते मिळण्याचा योग आला नाही.

यावर्षी नवरात्रातले ९ ही दिवस सकाळी अंबाबाईचे दर्शन घेतले दसऱ्याला कलशारोहणाकरिता शंकराचार्य आले असता त्यांना भेटून नमस्कार केला व त्यांचे आशीर्वाद घेतले.

शंकराचार्यांवरुन आठवण झाली. मी ७२-७३ मध्ये मी तिरुपतीला गेलो होतो. तेथील कार्यालयात अभिषेकाकरिता नोंदणी करण्यास गेलो असता त्या आठवड्यातील सर्वपूजा व अभिषेक शंकराचार्यांनी आरक्षित केले होते. त्यावेळी शंकराचार्यांच्याबरोबर (स्वामी जयेंद्रसरस्वती) तिरुपतीला प्रदक्षिणा घालण्याचा योग आला. त्यावेळी प्रसादाचे लाडू खूप मोठे असत. ते हातात घेऊन जात असता समोरुन संस्थानाचा हत्ती येतांना दिसल्याने मी एक लाडू त्यास दिल्यावर त्या हत्तीने माझ्या डोक्यावर सोंड टेकवून आशीर्वाद दिला.

२०१२ मध्ये संध्या करत असतांना मध्येच का उठू नये याचे कारण लक्षात आले. त्यावेळी तुम्ही म्हणता तेव्हा तुम्ही देवतेला सांगता की, **जपे मे सन्निधो भव**, त्यावेळी देवता बाजूस बसली असतांना तुम्ही उठून कसे जाल. तसेच नियमित नखे का कापावित तर पूजा करतांना देवाला गंध लावायचे असते. ती वाढली तर देवांना गंध लावतांना तुमची नखे लागतील.

फेब्रुवारी २०१३ मध्ये गोरेगावला बांगूरनगर येथील मैदानावर श्री. श्री.रविशंकर यांच्या कार्यक्रमास प्रथमच गेलो. कार्यक्रम चांगलाच झाला व तिथे गेल्यापासून घरी आल्यावर रात्रीपर्यत चंदनाचा सुवास येत होता.

आज मनाचे श्लोक वाचतांना लक्षात आले की यच्चयावत प्राणिमात्र, वृक्ष, नदी, डोंगर या सर्वांना जी धारण करते ती धरती.

२०१३ मध्ये तंबाखू मुक्ती दिनानिमित्त स्वामीनारायणच्या ८०० मुलांची पदयात्रा दादर ते बोरीवली अशी निघणार होती. त्याकरिता मराठीतून काढावयाच्या प्रेसनोटबाबत माझ्याकडे विचारणा झाली व मी त्वरित दोन तासात करून दिली. त्यामुळे त्यांनी मला गोरेगावला रत्नासमोर उभे राहण्यास सांगितले. त्यामुळे स्वामीनारायणच्या बऱ्याच संत मंडळीना भेटण्याचा योग आला व त्यांचे आशीर्वादही लाभले.

२०१३ मध्ये मृगनक्षत्रावरच पाऊस सुरु झाल्यामुळे **ग्रीष्म संपता मृगापरी मग धावत हा आला** ही लहानपणी शाळेत शिकलेल्या कवितेतील ओळींचा अर्थ आता समजला.

आज माझ्या एका विद्यार्थ्याचा फोन आला की मला गोरेगाव येथील गजानान महाराजांच्या मठात जायचे आहे. त्याप्रमाणे त्याला घेऊन मठात गेलो. त्याला जे करायचे होते ते त्यांनी केले. तिथे मठाचे संस्थापक श्री दादा तिथे आले. माझा विद्यार्थी त्यांना ओळखत होता. त्याने दादांना सांगितले की हे माझे गुरु. त्यावर दादांनी महाराजांकडे बोट दाखवून म्हटले, हे सद्गुरु.

आज भगवदगीतेबद्दलच्या चर्चेदरम्यान समजले की गीतेचे साप्ताहिक पारायण सोमवार ते रविवार रोज २, ३, ३, २, ३, ३, २ असे अध्याय म्हणून शेवटी विष्णुसहस्त्रनाम म्हणावे म्हणजे साप्ताहिक पारायण पूर्ण होते. याच चर्चेदरम्यान असेही समजले की लोकमान्य टिळकांनी वयाच्या सहाव्या वर्षीच गीता पाठ केली होती. तसेच विनोबा भावे यांनी त्यांच्या आईच्या सांगण्यावरुन की जिला संस्कृत समजत नव्हते तिच्यासाठी समश्लोकी गीताई लिहिली. अशीच गोष्ट सेनापती बापट यांच्याविषयीही समजली की ते सायन्स ग्रेजुएट असून स्वा. वीर सावरकरांच्या सांगण्यावरुन

रशियाला बॉम्बचे प्रशिक्षण घेण्यास गेले होते व पूर्णपणे स्वातंत्र्य चळवळीत गढून गेले होते. त्यांनीही गीतेचे मराठी समश्लोकी भाषांतर केले आहे.

तसेच एकदा मला मित्राकडून मोरोपंतांनी आर्यावृत्तात केलेले गीतेचे भाषांतर मिळाले. ते दुर्मीळ असल्याने मी दररोज दहा श्लोक याप्रमाणे पूर्ण लिहून काढले.

२०१३ च्या सप्टेंबरमध्ये भांबेड जवळ जाताना चाफळ येथील श्रीराम मंदिरात जाण्याचा योग आला व तिथे श्रीरामाचे दर्शन घेतल्यावर खूपच आनंद झाला. लांज्याला श्री सोनुबाबाच्या समाधीला भेट दिली. ते हर्दखळयाच्या मंदिरात ध्यान करीत असत. त्या मंदिरातही जाऊन आलो. त्या मंदिरात ध्यान करीत असतांना एकदा त्यांना दृष्टांत झाला की तू गाभाऱ्यात येऊन बस. कारण तू बाहेर असल्यामुळे माझा एक भक्त मंदिरात माझ्या दर्शनाला येऊ शकत नाही. तो गाभाऱ्यात गेल्यानंतर त्यांना समजले की तो भक्त म्हणजे एक वाघ होता.

१९९०-९१ दरम्यान नगरच्या इंडस्ट्रीअल कोर्टात काम करत असतांना त्यावेळी मी बँक ऑफ इंडियाच्या कॉलनीच्या टोकाला असलेल्या श्री काळे यांच्या घरी राहात होतो. माझ्याबरोबर माझे अन्य दोन अधिकारीही राहत होते. एक दिवस सकाळीच पांढरे कपडे घातलेला एक जण दाराशी आला. मी माझ्या सवयीनुसार माझ्या खिशातील पैसे त्याला दिले. त्यावर तुम्हाला नवनाथांचा आशीर्वाद आहे असे म्हणून आपला शर्ट वर केला तेव्हा आतमध्ये नवनाथांचे चित्र होते. मी नमस्कार केला व त्यानंतर तो निघून गेला. त्यानंतर महिनाभराच्या कालावधीतच आमच्या कोर्टाच्या न्यायाधीशांच्या शिपायाने मला मच्छिंद्रनाथांच्या समाधी स्थळी नेले. ते ठिकाण उंचावर आहे. आम्ही चढत असतांनाच माझ्यापुढे एक जण काठी टेकत जात होता. त्याकडे निर्देश करुन शिपाई म्हणाला साहेब हा आंधळा आहे व हा दररोज समाधीचे दर्शन घेतो. समाधी स्थळावर संपूर्ण शांतता होती. कोणीही इथे तिथे पैसे ठेवा हे सांगणारे नव्हते. दर्शन घेतल्यावर पायथ्याशी असलेल्या मावशीने दिलेली चटणी भाकर खाली व बाजूला असलेल्या तळयातील गढूळ पाणी प्यायलो. तिथे असे समजले की दरवर्षी चैत्र शु. प्रतिपदेस माच्छिंद्रनाथांचा देह वर काढला जातो. त्याचे पहिले लेपन काढून नवीन लेपन लावले जाते. काढलेले लेपन ताईतमध्ये भरुन दिले जाते. त्यानंतर कानिफनाथांच्या समाधीस्थानी जाण्याचा योग आला तसेच त्यांच्या तपश्चर्येच्या जागी जाण्याचाही योग आला. एकावेळी फक्त एकच माणूस आत शिरेल अशी गुहा आहे व खाली उतरुन जावे लागते. खाली हवा येण्यासाठी झरोकाही आहे. त्यानंतर गोरक्षनाथांच्या डोंगरावरही जाण्याचा योग आला. तिथे असे समजले की एका विशिष्ट दिवशी हे सर्वनाथ तेथे जमून चर्चा होते.

नगरहून मुंबईस आल्यानंतरच माझ्या मित्राने मला नवनाथ पोथी दिली. व पूर्वी उलेख केल्याप्रमाणे तिचे वाचन सुरु झाले. परंतु त्याची पूर्वपीठिका वा पार्श्वभूमी ही नगरमध्ये झाली. मला वाटते माझी नगरला झालेली बदली ही त्याकरताच होती की काय! नगरला असतांनाच माझे एक मित्र (ज्याने पोथी दिली) तो एक दिवस ऑफीसला आला व मला घेऊन शनि शिंगणापूरला गेला. त्या दिवशी तेथे शनिजयंतीमुळे यात्रा होती. आम्हास चांगले दर्शन झाले परंतु मी पाहिले की तेथील घराला कडीकुलुपे नव्हती. या संदर्भात मला एक गोष्ट आठवते कि माझा एक विद्यार्थी त्याच्या मित्राबरोबर शनि शिंगणापूरला गेला होता. तेथे चहा पीत असता त्याच्या लक्षात आले की आपले पाकीट गहाळ झाले आहे. त्यामुळे तो परत आल्या मार्गाने शोध घेत जात असता वाटेत त्याला त्याचे पाकीट दिसले ज्यामधून नोटा बाहेर

दिसत होत्या परंतु कोणीही ते पाकीट उचलले नव्हते. तिथे चोरी कुणीच करत नाही व केल्यास त्या क्षेत्राच्या बाहेर तो जात नाही, असा अनुभव आहे.

जानेवारी २०१४ मध्ये आमचा संस्कृत गीताभ्यास मंगळवार शुक्रवार असतो. तिथे नवनीत शब्द धातू रुपावलीचे लेखक डॉ. गोकाणी वय वर्षे ८२ हे आले होते. ते आजही ९.३० वाजता झोपतात व पहाटे ३ वाजता उठून प्राणायाम आसने करतात. त्यांनी दिलेल्या प्रकृतिस्वास्थ्याच्या टिपस पुढीलप्रमाणे.

१) सहा पांढरे मिरे आणि पांच काळे मिरे दररोज खावे.

२) अर्धा चमचा मेथी रात्री पाण्यात भिजवून सकाळी पाण्याबरोबर खाणे.

३) अर्धे लिंबू ग्लासात पिळून त्यात एक चमचा मध घालून प्यावे व लिंबाचे साल टाकून न देता सर्वांगास चोळणे.

मी गिरगांवात राहत असतांना तळमजल्याजवळील अंगणात गायी बांधलेल्या असत. स्वतः जेवणापूर्वी गोग्रास (गाईसाठी अन्नाचा भाग पानावर ठेवणे) ठेवण्याची प्रथा होती. तसेच कावळयालाही घास ठेवण्याची प्रथा होती. सदा मी पाहिले की एक गाय अस्वस्थ आहे व मागे पुढे हालचाल करत आहे. निरीक्षण केल्यावर लक्षात आले की तिची शेपटी कुंपणाच्या तारेत अडकली होती व तिला ती काढणे जमत नाही. हे लक्षात आल्यावर प्रथम मी गाईपुढे जाऊन तिला आश्वस्थ केले व तारेत अडकलेली तिची शेपटी सोडविली. गाईला हायसे वाटले. कृतज्ञतेचे भाव तिच्या डोळयात तरळले.

असेच एकदा ठाकुरद्वार रस्त्याने जातांना मला आरडा ओरडा ऐकू आला पहातो तो एक गाय उधळली होती. गाय हा प्राणी स्वभावत:च शांतच तिच्याकडून अशा प्रकारचे वर्तन अपेक्षित नाही. ती असे का करत असावी हे पाहिल्यावर लक्षात आले. तिच्या गळयातील दोरीच्या टोकाची गांठ तिच्या मागील पायाच्या खुराच्या बेचकीत अडकली आहे. त्यामुळे तिला नीट चालता येत नाही. मी पुढे होऊन गाईला चुचकारुन शांत केले व खाली वाकून खुराच्या बेचकीत अडकलेली गांठ दूर केली. पाय मोकळा झाल्याने गाय शांतपणे चालू लागली व आजूबाजूचा ओरडाओरडाही थांबला.

आज स्वामीनारायण मंदिरात पूजनीय श्री कोठारी स्वामींना प्रवचनानंतर हृदयरोग तज्ज्ञ श्री रमाकांत पांडा -, एशीयन हार्ट,- हॉस्पीटल यांचा पूजनीय श्री कोठारी स्वामींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नंतर आरतीच्या वेळी ८-१० जणांची नावे पुकारण्यात आली व पुढे आल्यावर त्यांच्या हातात तेवती पंचारती देण्यात आली. त्यावेळी श्री सुबोध स्वामी अचानक मंचावर आले व त्यांनी मला बोलावून माझ्या हातातही पंचारती दिली. आरती संपल्यानंतर श्री कोठारी स्वामी हस्ते प्रसाद देण्यात आला. त्यावेळी माझा विद्यार्थी आशीष व श्री सुबोध स्वामी यांनी माझा परिचय पूजनीय श्री कोठारी स्वामीशी करुन दिला. त्यांनी भरभरुन आशीर्वाद दिले. मी त्यांच्या पाया पडलो. श्री सुबोध स्वामीनी माझ्या भोजनाची खास व्यवस्था केली होती. इथून निघतांना आशीषने माझे बूट आणून दिले.

इथे नमूद करावेसे वाटते की-, बालविहार भाग २- या मुलांकरिता असलेल्या इंग्रजी पुस्तकाचे भाषांतर मी करुन दिले आहे. ते लवकरच प्रकाशित होईल.

अनेक स्तोत्रांमधे फलश्रुतीमध्ये-, **एतद् स्तोत्रं पठेत् नित्यम् महाशत्रु विनाशनम्,** म्हटले जाते. सामान्य माणसाला महाशुत्र कसा असणार? तर माणसातील षड्रिपू (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर) हे महाशत्रू होत. हा अर्थ ब्रह्मविद्येच्या पहिला पाठ चालू असतांना सांगितला गेला होता.

एके दिवशी संध्याकाळी आमच्या रस्त्याच्या कोपऱ्यावर एक गाढव उभे होते. रात्री जेव्हा मी परत बाहेर पडलो तेव्हा अचानक विचार आला की ते अजून तिथेच असेल का? असल्यास ते उपाशी असणार. प्रथम मनात आले की घरी जाऊन पोळ्या त्यास नेऊन घालाव्यात. पण विचार आला की गाढवाला पोळ्या देतो म्हटल्यावर सौ. आपल्यालाच गाढवात काढणार. या विचाराने दुकानातून पारले जी चा बिस्किटाचा पुडा घेतला व त्याला देण्यास निघालो तर लक्षात आले की ते भक्ष शोधण्यासाठी फिरत होते व दोन तीन कुत्री त्याच्यावर भुंकत होती. मी धावत जाऊन कुत्र्यांना हाकलले व पुडा फोडून गाढवापुढे ठेवला. माझी पाठ वळताच त्याने बिस्कीटे खाली मला खूप समाधान वाटले. मी काहीतरी सत्कार्य केल्याचा आनंद झाला. विचार करु लागलो की गाढव उपाशी असेल हा विचार देणारा कोण?

माझा वरील, गाढवपणा, मी माझ्या ११वीच्या विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात सांगितला असता आमच्यातील एकाने सांगितले की लष्करात सुरुंग पेरतेवेळी खेचराचा उपयोग होतो. तसेच आणखी एकाने सांगितले जंगलात जे पाणी गाढव पिते तेच प्यावे कारण ते अस्वच्छ पाण्यास तोंड लावत नाही.

असेच एकदा न्याहरीसाठी मी इडल्या घेऊन येत होतो. पहातो तर एक गाय आमच्या इमारतीच्या कुंपणाच्या प्रवेशद्वाराजवळ शांतपणे तोंड करुन होती. कां कुणास ठाऊक पण मला वाटले तिला भूक लागली आहे पण बिचारी सांगू शकत नाही. मी मागचा पुढचा विचारही न करता न्याहरीसाठी आणलेल्या इडल्या तिला खायला दिल्या व घरी येऊन तसे सांगितले. त्यावर पत्नीने विचारले ती उपाशी आहे हे तुम्हाला कसे समजले-,यावर काय बोलणार,

सर्वसाधारणपणे कुत्रा गोड खात नाही असा समज आहे. परंतु माझा अनुभव वेगळा आहे. अनेकदा गुरुवारी पेढे घेतांना दुकानाबाहेरील कुत्र्याने माझ्याकडे पाहिल्यावर त्याला खावयास काही हवे आहे हे समजल्याने मी बरेचदा त्यांना पेढे खायला दिले आहेत.

ऑगस्ट २०१४ मध्ये अंबरनाथ येथील श्री जयंतराव भडंग यांच्याकडे गेलो. त्यांनी तेथील एक सिद्धपुरुष श्री अण्णासाहेब म्हस्के यांजकडे नेले. मला काणे महाराजांचे चरित्र वाचीत जा असे सांगितले तसेच माझ्याबरोबर आलेला मित्राला गाणगापूर येथील पापविमोचन तीर्थात स्नान करण्यास सांगितले. निघतांना त्यांनी नारळ व वास्तुदोष - निवारण यंत्र दिले.

गणपतीला बहिणीकडे असतांना माझ्या पत्नीचा एक विद्यार्थी भेटला. त्याने एक विचार सांगितला. तो असा. की जर आपल्याला काही प्रश्न असेल तर आपण संगणकातील गुगलवर जाऊन त्याचे उत्तर शोधतो. तसेच तोच प्रश्न आपण विश्वामध्ये सोडून द्यायचा आपल्याला उत्तर मिळेल. कारण विश्व हा एक मोठा कॉम्प्यूटर आहे. हा विचार आचार्य

रजनीशांनी (ओशो) सांगितलेल्या विचारांशी जुळता आहे असे वाटते. कारण ते म्हणतात जर प्रश्न तुमचा आहे तर उत्तर पण तुमचेच हवे. दुसऱ्याचे उत्तर हे तुमच्या प्रश्नाचे समाधान नव्हे.

गणपती व कॉंप्युटर यावरुन मी एक कॉंप्युटरचा संगणन मंत्र तयार केला आहे.

ॐ मूषकाय विद्महे संगणकाय धीमहि ।

तन्नो महाजालं प्रचोदयात्॥

माझे एक पुण्याचे मित्र त्यांच्या पत्नीची पत्रिका घेऊन आले होते. त्यांच्या पत्नीस लहान मुलांच्या हाताच्या बोटांच्या / तळव्याच्या ठशावरुन त्याच्या करिअर मार्गदर्शनाचा उपक्रम चालू करावयाचा होता. मी प्रथमच अशा प्रकारच्या उपक्रमाबद्दल ऐकले.

२३-१२-२०१४ रोजी श्री. जयंतराव भडंग अंबरनाथ यांच्या घरी रामकृष्ण महाराज यांची भेट झाली. ज्यांनी काही वर्षे हिमालयात काढली होता. त्याच वेळी श्री अण्णासाहेब म्हस्के व श्री अण्णामहाराज (ठाणे) यांचेही दर्शन झाले.

कशाचे काय होणार व कुणाचे काय होणार हे माहीत असणारी माणसं असतात. हा विचार मला एका स्वप्नावरुन सूचला. डिसेंबर २०१४ मध्ये मला माझ्या मित्राबरोबर मंगलोरला जाण्याचा योग आला. ऊडीपी येथील हॉटेल मुडियारच्या बाहेर त्यांनीच बांधलेल्या नवनाथ मंदिरात जाण्याचा योग आला. एकाच दगडावर नऊ वेगवेगळ्या नागांची चित्रे कोरली होती. तसेच प्रसिद्ध श्रीकृष्ण मंदिरातही जाण्याचा योग आला. दत्त जयंतीस मुलुकि येथील उग्र नरसिंहाच्या मंदिराला भेट देण्याचा योग आला. ही मूर्ती दत्तजयंतीसच येथे आल्यामुळे या दिवशी येथे मोठा उत्सव असतो. रात्री फटाक्यांची आतषबाजी असते व हजारो लोक उत्सवाला येतात. लागोपाठ तीन दिवस त्या दर्शनाचा योग मला आला. तसेच तेथील वास्तव्यात मंदारथी देवी दुर्गा परमेश्वरीच्या दर्शनाचा लाभ झाला.

फेब्रुवारी २०१५ मधे डॉ. नरेद्र काळे यांना भेटण्याचा योग आला. माझे मित्र श्री विजय फडके यांनी मला त्यांच्याकडे नेले. आम्ही गेलो तेव्हा ते आनंदी मनस्थितीत होते. विजयचे व त्यांचे संभाषण चालू होते. त्यांच्या दुपारच्या ३ च्या कार्यक्रमाची सुरुवात ते ज्या कवितेने करणार होते ती त्यांनी आम्हाला म्हणून दाखविली. विजयने त्यांना माझी ओळख करुन दिली. तेव्हा तुमची पुस्तके मी वाचली आहेत व माझ्या एका मित्राने तुमची भेट घेऊन नामदीक्षा घेतल्याचे त्यांना सांगितले.

माझा एक मित्र म्हणाला की मी दोन दिवसांनी बेल्लूर मठात जात आहे, कारण रामकृष्ण परमहंसांची जयंती आहे. मी त्याला पैसे दिले व अचानक माझ्या तोडून ठाकुरांना माझा नमस्कार सांग असे आले. नंतर मीच विचार करत बसलो का माझ्या तोंडून ठाकूर हा शब्द कसा आला? तेथे जाऊन आल्यावर त्याने गुळाच्या बत्ताशांचा प्रसाद मला दिला जे मी प्रथमच पाहिले. तसेच भगव्या रंगाची एक शबनमही त्याने माझ्यासाठी आणली होती.


१८-३-२०१५ रोजी माझ्या मित्राची तरुण सून वय ३९ वारल्याचे समजल्याने मी व माझा मित्र गोरेगाव पूर्व येथून रिक्षाने आरे कॉलनीमार्गे मुलुंडला जात होतो.




श्री. जयंतराव भडंग



श्री. अण्णासाहेब म्हस्के



प. पू. आगाशे काका
(कृष्णानंद सरस्वती महाराज)



श्री. रामकृष्ण महाराज

पाच मिनीटांवर पवई असतांना माझ्या लक्षात आले की माझ्या पायात चप्पल नाही. हे मित्राला सांगितल्यावर मित्राने तात्काळ रिक्षावाल्याला युटर्न घेण्यास सांगितले व आम्ही दोन्ही दिशांना चपलेचा शोध घेत होतो. पण १.५ किलोमीटर अंतरावर मला वाटेत चप्पल दिसली. ती घालून आम्ही परत मुलुंडला निघालो. त्यावर मित्र म्हणाला आश्चर्य आहे. त्यावर मी म्हटले की कदाचित चपलेला माझा पाय सोडायचा नव्हता.

ध्यानाला बसल्यावर मुंगी देखील अंगावर आल्याची जाणीव होते. (इतकी सूक्ष्म जाणीव) म्हणून त्या मुंगीमुळे झालेल्या जाणीवेचे व मुंगीचे आभार मानावयाचे का चिडून त्या मुंगीला चिरडून टाकायचे? त्याचबरोबर असाही विचार आला की ध्यानाला बसल्यावरच या मुंग्या का येतात इतर वेळी कुठे असतात?

अक्षय तृतीयेला (२०१५) अचानक हरिहरेश्वरला जाण्याचा योग आला. नेहमीच्या प्रथेनुसार मी हार, तुरे, अत्तर, कापूर, उदबत्ती व पंचखाद्याचा नैवेद्य (काजू, बदाम, खारीक, बेदाणा व पत्री खडीसाखर) घेतला. हा नैवेद्य नेण्यामागचे कारण म्हणजे एकतर हा पूर्णपणे कोरडा असतो व पेढे बर्फीप्रमाणे खराब होण्याची भीती नसते. मी नेलेली तयारी पाहून तेथील गुरव खूप खूष झाले. तेथे वेगवेगळ्या कारणांसाठी कालभैरवाच्या वेगवेगळ्या अवयवांवर फळे लावून कौल मागितला जातो. ते पहाण्यास मिळाले.

एकदा मी मोरगांवला गेलो असता तेथील गाणपत्य श्री गुणेश गोसावी यांना असे सांगितले की मोरगांवच्या गणपतिचे दर्शन घेण्यापूर्वी प्रथम तथाल नग्नभैरवाचे दर्शन घ्यावयाचे व नंतरच मोरेश्वराचे दर्शन घ्यावयाचे. व नंतर कुठेही इतरत्र न जाता तडक घरी परतावयाचे. अनेकदा आपण दर्शन घेतल्यानंतर इतरत्र जातो, त्या ऐवजी अगोदर सर्व करुन घरी जाण्यापूर्वी दर्शन घ्यायचे व नंतर घरी परतायचे.

२३-४-२०१५ रोजी ठाण्याला मी व्रतबंधासाठी गेलो असता अचानक मला व्यासपीठावर बोलावले व जोतिषी म्हणून सत्कार करुन मला श्रीफळ व पाकीट दिले असे का विचारल्यावर गुरुजी म्हणाले की व्रतबंधापूर्वी जोतिषाचा सत्कार करण्याची प्रथा आहे. हे गुरुजी रत्नागिरीचे होते.

२६-४-२०१५ रोजी माझा मित्र हिंदुजामध्ये दाखल असतांना रात्री झोपण्यासाठी मी तेथे गेलो. पहाटे ५ वाजता उठलो व तेथेच बसून माझी पहाटेची आह्निके उरकली. खरे तर दुसरीकडे गेल्यावर हे सर्व कसे करायचे हा प्रश्न असतो. परंतु बसण्यापूर्वी आपण रोजच्याच जागी आहोत या भावनेने ती करावित. ते झाल्यामुळे मला खूपच आनंद झाला. कारण माझ्या दिनक्रमात स्थानबदलामुळे खंड पडला नाही.

दिनांक १६-५-२०१५ रोजी माझ्या मित्राच्या सूनेच्या निधनानिमित्त स्वामीनारायण मंदिरातील संतांना व त्यांच्या आप्तेष्टांकरिता भोजनाचा कार्यक्रम होता. मलाही आमंत्रण असल्यामुळे मी त्या कार्यक्रमास गेलो होतो. भोजन झाल्यानंतर माझ्या मित्राच्या मुलाने मला एक पाकीट दिले तसेच योगीमहाराज व प्रमुख स्वामींच्या आठ दुर्मीळ रेखाचित्रांचा संग्रह दिला. घरी आल्यावर मी पाकीट उघडून पाहिले तर आत एक चेक होता व तो मोठ्या रकमेचा होता.

मला आश्चर्य वाटण्याचे कारण म्हणजे १५ दिवसांपूर्वी मला स्वप्नात माझ्या मित्राचा मुलगा मला एक लांबलचक चेक देतांना दिसला होता.

एकदा एकाने मला प्रश्न विचारला की वणीच्या देवीला १८ हात आहेत हे कसे काय? यावर त्याला सांगितले की नवरात्रातले नऊ दिवस देवी विविध आयुधांनी लढली. त्या प्रत्येक दिवसाचे वैशिष्टय दाखवायचे झाले तर देवीच्या नऊ मूर्ती घडवाव्या लागतील. त्यामुळे देवी तीच ठेऊन तिला अठरा हात दाखवल्याने उद्देश सफळ झाला. आपल्यापुढील समस्या जर सुटत नसेल किंवा त्यावर काय उपाय करावा हे कळत नसेल तर देवीचे दर्शन घेतल्यावर ती मार्ग दाखवते असे म्हणतात.

आपण नेहमीच शेषशायी विष्णूचे चित्र पहातो. यामध्ये लक्ष्मी पादसंवाहन करीत असून नाभीतून निघालेल्या कमळामध्ये ब्रह्मदेव दाखवलेला असतो, हा वैकंठवासी आहे असे म्हटले जाते. तर मग त्याचे समुद्रातील हे चित्र काय दर्शविते. तर या भवसागरातून पार होण्यास लक्ष्मीचे पाय धरण्याऐवजी षड्रिपूंवर विजय मिळवून आपली कर्तव्ये करत राहिले तर विष्णूप्रमाणेच आपण आनंदी राहू.

तसेच मनात येणारा दुसरा प्रश्न म्हणजे ब्रह्मदेवाची उत्पत्ती नाभीतून व अधांतरीच का? तर जीवाचे संपूर्ण भरण पोषण गर्भावस्थेत असतांना नाभीतून नाळेमार्गेच होते. त्यामुळे माणसाच्या सर्व भाव भावना विचार यांचे केद्रस्थान नाभी हेच आहे. भीतीने पोटात गोळा आला ही म्हण तर परिचितच आहे. तसेच आनंद पोटात माझ्या मावेना ही एका काव्यातील ओळही आपणा सर्वाच्या माहितीची आहेच. विष्णू हा शास्ता आहे. पालनकर्ता आहे. त्यामुळे माझ्या मनात असे येते की एखद्या कंपनीच्या प्रमुखपदी असलेल्या व्यक्तीने हे चित्र प्रत्यक्ष डोळयासमोर ठेऊन कारभार केला तर लक्ष्मी नक्की त्याच्यावर कृपा करील.

ऑरा इमेजिंग केल्यानंतर सप्तचक्रांच्या शुद्धीकरता मला काही साधना सांगितली गेली व मी ती करीत आहे. ते करीत असतांना असा विचार आला की तानापिहीनिपाजा हा वर्णपट उलगडतो. त्याला जसे कारण आहे तर या रंगांनाही वास आहे का? कारण बऱ्याच अंध व्यक्ती स्पर्शानेही रंग ओळखतात. तसेच वासांनीही रंग ओळखता येतात का?

खाली दिलेली प्रार्थना म्हणजे वेळोवेळी अमुक एक राहिले आहे आवश्यक आहे असे वाटून ती तयार झालेली आहे. कदाचित् हिच्यामध्येही पुढे आणखी काही भर पडू शकेल.

परिशिष्ट

१. प्रार्थना

आसनावर एका चादरीची घडी ठेवून त्यावर पद्मासनात बसून

खालील प्रार्थना म्हणतो.

पूर्व पश्चिम. दक्षिण. उत्तर. आग्नेय. नैऋत्य. वायव्य. ईशान्य. उर्ध्व. अधर. या दादिशांना माझा नमस्कार. सर्व दिशा पवित्रतेने, मांगल्याने, प्रकाशाने व आनंदाने भरुन जावोत. हे परमेश्वरा सर्वाना सुखी ठेव व सर्वांना चांगली बुद्धी दे. माझे गुरुंना माझा नमस्कार ज्यांचे आशीर्वाद सतत मजबरोबर आहेत.

सर्व देवदेवतांना माझा नमस्कार

माझ्या विविध इंद्रियांतर्गत असलेल्या

विविध देवदेवतांना माझा नमस्कार

सर्व ऋषिमुनींना माझा नमस्कार

सर्वसिद्धांना माझा नमस्कार

सर्व संतमहंतांना माझा नमस्कार

सर्व आचार्य ब्राह्मणांना माझा नमस्कार

सर्व साधकांना माझा नमस्कार

सर्व समाधिस्थ साधुसंतांना माझा नमस्कार

या चराचराचे लालन, पालन, भरण पोषण करणाऱ्या

या पृथ्वीला माझा नमस्कार

या पृथ्वीला ज्या शेषाने आपल्या मस्तकी

धारण केले त्या शेषाला माझा नमस्कार

सर्व नवग्रहांना माझा नमस्कार

सर्व नक्षत्रांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा माझ्या श्वसनयंत्रणेचे रक्षण कर

माझा संपूर्ण चेहरा, ओठ, दात, जीभ, टाळू व लाळोत्पादक

पिंड यांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा यांचे रक्षण कर

माझे दोन्ही बाहू हात व हातांची बोटे यांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर.

माझे स्वर व स्वरयंत्र यांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर व माझा कंठ शुद्ध कर

माझी श्वासनलिका दोन्ही फुफ्फुसे व त्यातील अगणित वायुकोष

यांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझे हृदय व हृदयस्थ परमेश्वर यांना माझा नमस्कार

माझे हृदय व संपूर्ण शरीरभर पसरलेल्या माझ्या रक्तवाहिन्या

ज्या सातत्याने रक्ताभिसरणाचे कार्य करीत आहेत त्यांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझ्या छातीच्या पिंजऱ्याला माझा नमस्कर

हे परमेश्वरा त्याचे रक्षण कर

माझी अन्ननलिका जठर यकृत प्लिहा स्वादुपिंड लहान आतडे

मोठे आतडे पाचक रस व पाचक रस निर्मिती केंद्रे

या सर्वांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझे उत्सर्जक उत्पादक इंद्रियांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझी कंबर ढुंगण व कुल्ले यांना माझा नमसकार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझी पाठ व मेरुदंड यांना माझा नमस्कार

याना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझ्या दोन्ही पोटऱ्या पावले व पायाची बोटे व घोटे यांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

दोन्ही पायाच्या बोटातील सांधे, तळवा व खोट (टाचेचे) सांधे यांना नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझ्या दोन्ही गुडघ्यातील सांधे मांडीचे कमरेतील इतर सांधे यांना माझा नमस्कर

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझ्या माकडहाडापासून मानेपर्यंत असलेल्या मेरुदंडातील प्रत्येक मणक्यातील सांध्याला माझा नमस्कार.

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर.

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर.

माझ्या दोन्ही खांद्यातील, हाताच्या कोपरातील, मनगटातील, व बोटातील सांधे

यांना माझा नमस्कार

हे परमेश्वरा त्यांचे रक्षण कर

माझ्या संपूर्ण शरीरातील या विविध यंत्रणांना

जी शक्ती सतत कार्यरत ठेवते कार्यांवित करते

त्या परमेश्वरी शक्तीला माझा नमस्कार

माझ्या आसनाला माझा नमस्कार

या भूमीला माझा नमस्कार

आम्ही त्यांचे आभारी आहोत

आम्ही त्यांचे आभारी आहोत

आम्ही त्यांचे आभारी आहोत

२. भेट दिलेली ठिकाणे

१९५० पासून खालील स्थळांना भेटी दिल्या-

गणपती

१	सिद्धि विनायक-प्रभादेवी	८	गणपती-औरंगाबाद
२	अष्टविनायक	९	गणपतीपुळे
३	टिटवाळा	१०	दशभुजा गणपती-पौड पुणे
४	कड्यावरचा गणपति-आंजर्ले	११	तळ्यातला गणपती-पुणे
५	लकक्ष्मी गणेश-हेदवी	१२	नवश्या-नाशिक, गंगापूररोड
६	महागणपती-शिरोळी (उडपी)	१३	वाईचा गणपती
७	गणपती-उज्जैन	१४	पंचमुखी गणेश, देवल गाणगापूर

शंकर

१	घृष्णेश्वर-दौलताबाद	११	व्याडेश्वर-गुहागर
२	परळी वैजनाथ	१२	मंगेशी-गोवा
३	औंढा नागनाथ-परभणी	१३	हरिहरेश्वर-श्रीवर्धन
४	त्र्यंबकेश्वर-नाशिक	१४	व्याघेश्वर-आसूद
५	ओंकारेश्वर-उज्जैन	१५	विळेश्वर-आसूद
६	महांकाळेश्वर-उज्जैन	१६	अंबरनाथ
७	अमलेश्वर-उज्जैन	१७	पिसारनाथ-माथेरान
८	भीमाशंकर-तळेगांव	१८	श्री कलेश्वर-गाणगापूर
९	बाबुलनाथ-मुंबई	१९	महाबळेश्वर
१०	खेम-मुरुड	२०	श्री शूलपाणेश्वर मंदिर

देवी

१	मुंबादेवी	१२	शांतादुर्गा-गोवा
२	महालक्ष्मी	१३	तुळजाभवानी-तुळजापूर
३	एकवीरा-कार्ला	१४	पामादेवी-गोवा
४	जीवदानी-विरार	१५	रेणुकादेवी-माहूर
५	चणकाई-दाभोळ	१६	शितलादेवी-चौल
६	आंबेजोगाई-बीड	१७	पद्मावती-चौल
७	सप्तशृंगी-वणी	१८	कालिकादेवी-तुरवड

८ महालक्ष्मी-कोल्हापूर
९ विध्यवासिनी-उज्जन
१० खेडजाई रेडजाई-खेड
११ अंबाबाई-गोवळकोट-चिपळुण
१९ वज्रेश्वरी
२० दुर्गा परमेश्वरी-मुडबिद्री
२१ दुर्गा परमेश्वरी-बेलमंड

समाधी

१ मच्छिंद्रनाथ-मढी नगर
२ कनीफनाथ-मढीनगर
३ निवृत्तीनाथ-त्र्यंबकेश्वर
४ ज्ञानेश्वर-आळंदी
५ तुकाराम-देहू
६ एकनाथ-पैठण
७ नामदेव-पंढरपूर
८ रामदास-सज्जनगड
९ गजानन महाराज-शेगाव
१० गजानन महाराज-अक्कलकोट
११ नित्यानंद-वज्रेश्वरी
१२ मुक्तानंद-गणेशपुरी
१३ गुळवणी महाराज-येऊर
१४ गोदवलेकर महाराज-गोंदवले
१५ नारायण काणे-मुरुड
१६ स्वरुपानंद-पावस
१७ ऊपासनी महाराज-साकोरी
१८ राघवेद्र स्वामी-मंत्रालयम
१९ श्री साईबाबा –शिरडी
२० सिद्ध रामेश्वर-सोलापूर
२१ दामाजीपंत-गोपाळपूर
२२ श्री वासुदेवानंद सरस्वती-गरुडेश्वर
२३ रंगावधूत स्वामी -नारेश्वर
२४ श्री काडसिद्धेश्वर-कणेरीमठ कोल्हापूर
२५ राऊळ महाराज-पिंगुळा, कुडाळ
२६ श्री विश्वनाथ महाराज-मसुराश्रम

आश्रम

१ तपोवन-ठाणे पांडुरंग शास्त्री आठवले
२ रजनीश आश्रम-कोरेगांव, पुणे
३ सांदिपनी आश्रम उज्जैन
४ संन्याशाश्रम-विलेपार्ले
५ रामकृष्ण आश्रम, खार
६ राघवेंद्र स्वामी- जोगेश्वरी
७ गोरक्षनाथ, नगर
८ खडावली-(अक्कलकोट)
९ कैकाडी महाराज-पंढरपूर
१० गगनगिरी महाराज -खोपोली
११ नारेश्वर आश्रम
१२ श्री काडसिद्धेश्वर आश्रम-कणेरी
१३ मसुराश्रम-गोरेगाव (पूर्व)

इतर ठिकाणे

१	लक्ष्मी केशव- कोळीसरे
२	परशुराम – चिपळूण
३	श्रीकृष्ण मंदिर- मथुरा
४	हरिद्वार
५	हृषीकेश सहस्त्रधारा
६	सेंटफ्रांसिस चर्च – गोवा
७	जलाराम बाप्पा- गुजरात
८	गिरनार- सौराष्ट्र वेरावळ
९	खंडोबा जेजुरी, नळदुर्ग
१०	नृसिंहवाडी
११	नेवासे- नगर
१२	शनिशिंगणापूर
१३	तिरुपती
१४	हरे राम हरेकृष्ण मंदिर-जुहू
१५	हाजीअली
१६	हाजीमलंग
१७	केशवराज-आसूद दापोली
१८	वासुदेव मंदिर- वाटेगाव सांगली
१९	दत्तभिक्षा लिंगमंदिर, कोल्हापूर
२०	विठ्ठलमंदिर, शहड
२१	श्रीदत्त शिखर, माहूर
२२	मच्छिंद्रनाथ मंदिर, औरंगाबाद
२३	गुरुद्वारा, नांदेड
२४	स्वामीभुवन, नागरगाव लोणावळा
२५	गोरक्षनाथ मठ, त्र्यंबकेश्वर
२६	शीतलादेवी मंदिर, चौल
२७	महाविनायक, रेवदंडा
२८	बिर्ला मंदिर
२९	गोपाळपूर
३०	संत जनाबाई
३१	गाणगापूर
३२	मंत्रालयम तुंगभद्रा नदी
३३	नृसिंहसरस्वती मंदिर, कारंजा
३४	लखनौ
३५	नृसिंह मंदिर, वाई
३६	कबीरवड
३७	साकोरी
३८	पनवेल साईमंदिर
३९	गणेशपुरी
४०	सुला वाईन्स नाशिक
४१	मोराची चिंचोली
४२	रांजणनिभोज, झुलता पूल
४३	मळगंगा देवी
४४	चाफळचे राममंदिर
४५	भांबेड येथील समाधी
४६	देवी मंदिर भांबेड
४७	योगेश्वरी, कोंढाणे
४८	व्याडेश्वर, कोंढाणे
४९	श्रीकृष्ण मंदिर उडपी
५०	श्री उग्रनृसिंह, मुल्की

३. नर्मदाष्टकम्

सबिन्दुसिन्धुसुस्खलत्तरङ्गभङ्गरञ्जितं

द्विषत्सु पापजातजातकादिवारिसंयुतम् ।

कृतान्तदूतकालभूतभीतिहारिवर्मदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ १॥

त्वदम्बुलीनदीनमीनदिव्यसम्प्रदायकं

कलौ मलौघभारहारिसर्वतीर्थनायकम् ।

सुमच्छकच्छनक्रचक्रवाकचक्रशर्मदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ २॥

महागभीरनीरपूरपापधूतभूतलं

ध्वनत्समस्तपातकारिदारितापदाचलम् ।

जगल्लये महाभये मृकण्डुसूनुहर्म्यदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ३ ॥

गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा

मृकण्डुसूनुशौनकासुरारिसेवितं सदा ।

पुनर्भवाब्धिजन्मजं भवाब्धिदुःखवर्मदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ४॥

अलक्ष्यलक्षकिन्नरामरासुरादिपूजितं

सुलक्षनीरतीरधीरपक्षिलक्षकूजितम् ।

वसिष्ठशिष्टपिप्पलादिकर्दमादिशर्मदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ५॥

सनत्कुमारनाचिकेतकश्यपात्रिषत्पदैः

धृतं स्वकीयमानसेषु नारदादिषतपदैः ।

रवीन्दुरन्तिदेवदेवराजकर्मशर्मदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ६॥

अलक्षलक्षलक्षपापलक्षसारसायुधं

ततस्तु जीवजन्तुतन्तुभुक्तिमुक्तिदायकम् ।

विरिञ्चिविष्णुशंकरस्वकीयधामवर्मदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ७॥

अहो धृतं स्वनं श्रुतं महेशिकेशजातटे

किरातसूतबाडबेषु पण्डिते शठे नटे ।

दुरन्तपापतापहारि सर्वजन्तुशर्मदे

त्वदीयपादपङ्कजं नमामि देवि नर्मदे ॥ ८॥

इदं तु नर्मदाष्टकं त्रिकालमेव ये सदा

पठन्ति ते निरन्तरं न यान्ति दुर्गतिं कदा ।

सुलभ्यदेहदुर्लभं महेशधामगौरवं

पुनर्भवा नरा न वै विलोकयन्ति रौरवम् ॥ ९॥

इति श्रीमदाद्यशङ्कराचार्यविरचितं नर्मदाष्टकं सम्पूर्णम् ।

नर्मदे हर । नर्मदे हर। नर्मदे हर।।

१) बिंदूपासून सिंधूपर्यंत अखंड तरंगाकार प्रवाहाने नटलेल्या आणि दुष्ट पापप्रवृत्तीमुळे प्राप्त होणाऱ्या जन्मपरंपरेचा नाश करणाऱ्या जलाने युक्त अशा तुझ्या चरणकमालांना, कालस्वरूप यमदूतांचा भीती हरण करून रक्षण करणाऱ्या देवी नर्मदे, मी नमन करतो.

२) तुझ्या जलामध्ये विहरणाऱ्या दीनदुबळया मत्स्यांना दिव्यता प्रदान करणाऱ्या, कलियुगातील महादोषांचा परिहार करणाऱ्या सकलतीर्थांमध्ये वरिष्ट अश्या तुझ्या पादपद्यांना, प्रचंड मासे, कासवे आणि मगरींच्या समुदायांचे, तसेच चक्रवाक पक्ष्यांचे कल्याण करणाऱ्या देवी नर्मदे, मी नमन करतो.

३) महाप्रचंड पुराने भूतलावरील सारी पापे धुऊन काढणाऱ्या आणि घनगंभीर नादाने पातकांच्या राशी आणि पर्वतप्राय संकटे यांचा चक्काचुर करणाऱ्या तुझ्या चरणांबुजांना, प्रलयकालीन महाभयाच्या वेळी मार्कण्डेय ऋषींना आपल्या ठायी आश्रय देणाऱ्या देवी नर्मदे, मी नमस्कार करतो.

४) मार्कण्डेय, शौनक, देवेंद्र ज्यांचे सदैव सेवन करतात, त्या तुझ्या जलाचे नुसते दर्शन होताच माझे भय कुठल्या कुठे पळून गेले. पुनर्जन्म तसेच संसारसागरातील दु:खापासून कवचाप्रमाणे रक्षण करणाऱ्या देवी नर्मदे, तुझ्या पदकमलांना मी वंदन करतो.

५) अगणित किन्नर, देव आणि असुर ज्यांची पूजा करतात आणि ज्यांच्या तीरावरिल लक्षावधी जलाशय निरखीत धीटपणे अखंड कूजन करीत असतात, त्या तुझ्या चरणकमलांना, मुनिश्रेष्ठ वसिष्ठ, पिप्पलाद, कर्दमप्रभूतीचे कल्याण करणाऱ्या देवी नर्मदे, मी नमन करतो.

६) सनत्कुमार, नचिकेता, कश्यप, अत्रि, नारदादी भुंगांनी ज्यांना आपल्या अंत:करणांत साठविले आहे, त्या तुझ्या पाद्रपद्मांना, सूर्य, चंद्र, अन्तिदेव, देवराज इंद्र यांच्या सत्कर्मांना विश्वात प्रतिष्ठित करणाऱ्या देवी नर्मदे वंदन करतो.

७) दृष्टादृष्ट लक्षावधी पातकांच्या राशीचा भेद करणाऱ्या तसेच जीवजंतूंना भोग आणि मोक्ष प्रदान करणाऱ्या तुझ्या चरणांबुजांना, ब्रह्माविष्णू महेशांना आपापल्या ठायी सुप्रतिष्ठित करणाऱ्या देवी नर्मदे वंदन करतो.

८) भगवान शंकराच्या जटेतून निघालेल्या नर्मदेच्यातटावरील किरात, सूत, वाडव, पंडित, शठ, नट अशा समस्त जनांच्या मुखी अमृतोप संजीवक असे नर्मदेचे गुणगानच ऐकू येते. दुस्तर पापतापांचा संहार करून सकल जीवांचे कल्याण करणाऱ्या देवी नर्मदे, तुझ्या पदकमलांना मी नमन करतो.

९) हे नर्मदाष्टक नेहमी त्रिकाळी जे निरतंर पठण करतात ते कधीही दुर्गतीला जात नाही. एवढेच काय, मानवदेहातील अतिदुर्लभ आणि गौरवास्पद असे शिवपद अनायासे प्राप्त झाल्याने ते जन्मबंधनातून मुक्त होतात व रौरवादी त्यांना नरकांचे दर्शनही घडत नाही.

४. कपिलगीतेतील श्लोक

ऋषिसिद्ध उवाच ।

जलस्नानाद्बहिः शुद्धिरन्तःशुद्धिः कथं भवेत् ।।

योगिनां च कुतः स्नानं कृपालो कपिलोच्यताम् ।।४.२२।।

ऋषिसिद्ध म्हणतात:

हे कृपाळु कपिल मुने, जलस्नानाने शरीराची बाह्य शुद्धी होते, परंतु अंत:शुद्धी कशी होईल? योग्यांना स्नान कसे घडते ते सांगा ।।२२।।

कपिल उवाच ।

वामनासापुटे हीडा पुटे दक्षे च पिङ्गला ।

गान्धारी वामकर्णे च हस्तिनी दक्षिणे तथा ।।४.२३।।

कपिल म्हणतात:- डाव्या नाकपुडित इडा, उजवीत पिगंला, डाव्या कानांत गांधारी, उजव्यात हस्तिनी।।२३।।

सुषुम्ना चाङ्गदा प्रोक्ता जिह्वाग्रे च सरस्वती ।

वामनेत्रे चक्षुषा तु दक्षिणेऽलंबुषा मता ।।४.२४।।

अंगदा सुषूम्नालाच म्हणतात, जिव्हाग्रावर सरस्वती डाव्या डोळयात चक्षुषा व उजव्यात अलंबुषा अशी ही नाड्याची स्थाने आहेत.।।२४।।

कुहूर्गुदस्था संप्रोक्ता शंखिनी लिङ्गसंस्थिता ।

मूत्रद्वारे वारूणी स्यात् सर्वाङ्गे च पयस्विनी ।।४.२५।।

गुदांत कुहू, लिंगात शंखिनी, मूत्राद्वारात वारूणी आणि सर्व देहात पयस्विनी याप्रमाणे नाड्यांची स्थाने आहेत।।२५।।

नाड्यो द्वादश संप्रोक्ता शरीरे सुव्यवस्थिताः ।

व्याप्नुवन्ति दश द्वारं चराचरनियामकाः।।४.२६।।

या वर सांगितलेल्या बारा नाड्या शरीरात आपापल्या जागी व्यवस्थितपणे राहून दशद्वारात फिरत असतात आणि चराचरांचे नियमन करतात।।२६।।

इडा भगिरथी गङ्गा पिङ्गला यमुना नदी ।

सुषुम्ना गण्डकी प्रोक्ता कृष्णावेण्यौ सरस्वती ।।४.२७।।

इडा ही भागिरथी गंगा, पिंगला ही यमुना, सुषुम्ना ही गंडकी आणि कृष्णावेणी ही सरस्वती असे म्हटले आहे।।२७।।

कुहूश्च नर्मदा ज्ञेया तापी स्याच्छंखिनी तथा ।

गान्धारी चापि कावेरी वारूणी गौतमी तथा ।।४.२८।।

कुहू हींच नर्मदा, शंखिनी हीच तापी, गांधारी हीच कावेरी, वारूणी हीच गौतमी।।२८।।

ताम्रपर्णी सुबानाडी सिन्धुर्ज्ञेया च हस्तिनी ।

गोमत्यलंबुषा चैव पूर्णा पूर्णपयस्विनी ।।४.२९।।

चक्षुषा हीच ताम्रपर्णी, सिंधु हीच हस्तिनी आणि पूर्णपयस्विनी हीच गोमत्यलंबुषा जाणावी।।२९।।

इति नाडी नदी प्रोक्ता शरीरे वर्तते सदा ।

पवनं च तुरीयं च सर्वतः स्नानमुच्यते।।४.३०।।

येणेप्रमाणे नाड्यांच्या ठिकाणी नद्याची कल्पना करावी आणि त्या नद्या आपल्या शरीरात आहेत असे समजावे. योग मार्गाने जाऊ लागले असता आत्माचे तुर्यं साक्षीस्वरूप होते आणि सर्व तीर्थांचे स्नान घडते।।३०।।



लेखकाचा परिचय

परिस्थितीमुळे महाविद्यालयीन शिक्षण घेता येणार नाही त्यामुळे शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवून शिक्षण घ्यायचे असे ठरवून संस्कृतचा अभ्यास केला. त्याकरता १० हजार बाहेरचे श्लोक केले परंतु शिष्यावृत्तीने हुलकावणी दिली. वडीलांचे मालक, मावशी व मावसभाऊ तसेच प्रा. दंडवते यांच्या सहकार्याने शिक्षण पूर्ण केले.

कामगार कार्यालयात सामाजिक व आर्थिक पहाणी विभागामुळे संपूर्ण महाराष्ट्र पहाता आला १९८० मधे राजपत्रित अधिकारी झाल्यानंतर औरंगाबाद, जालना, धुळे व तसेच नगर येथील औद्योगिक न्यायालयात काम केले. सुरक्षारक्षक मंडळावर सचिव म्हणून काम करुन स्वेच्छानिवृत्ती घेतली.

स्वेच्छानिवृत्तीनंतर खाजगी कंपनीत काम केले. मुंबईतील कापड गिरण्या बंद झाल्यामुळे ती कंपनीही बंद झाली.

त्यानंतर विविध कंपन्यांमधे कामगार कायदे विषयक सल्लागार म्हणून काम केले व आजही करत आहे.

तत्वज्ञान, जोतिष या विषयावरचे वाचन कायम चालू आहे.

आर्थिक मोबदल्याची अपेक्षा न करता पत्रिका पाहून मार्गदर्शन करणे चालू आहे.

विजय बालकृष्ण काणे :

६, महेश निवास लोकमान्य टिळक नगर, रोड नं. ३,

म. गा. रोड, गोरेगाव (प).

मुंबई- ४०० १०४.

फोन. २८७५९१४६, ९८३३०३२८२९.